रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ५७
www.ramprahar.com
◆ शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

कोयना पुनर्वसित गावांच्या सुविधांना मिळणार गती/२
पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा!/६
सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानात फुटबॉल स्पर्धा/८

## ब्रिक्स समूह २१ देशांचे मजबूत कुटुंब -पीएम मोदी



**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीत आयोजित ब्रिक्स बिझनेस फोरमच्या लीडर्स सेशनमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरातील प्रतिनिधींचे स्वागत करत ब्रिक्सच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, ब्रिक्स समूह यंदा स्थापनेची २० वर्षे पूर्ण करीत आहे. २००६मध्ये अवघ्या चार देशांनी एकत्र येत स्थापन केलेला हा गट आज भागीदार देशांसह २१ देशांचे एक मजबूत कुटुंब बनला आहे. पंतप्रधानांनी नमूद केले की, ब्रिक्स देश आता केवळ व्यापारापुरते मर्यादित नसून जागतिक आव्हानांवर मात करणारे नावीन्यपूर्ण उपायांचे केंद्र बनले आहेत. तळागाळातील उपक्रमांपासून ते अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंत सर्व क्षेत्रांत येथे नव्या संधी निर्माण होत आहेत. भारतात आयोजित हा फोरम आतापर्यंतचा सर्वांत मोठा ब्रिक्स बिझनेस फोरम ठरला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# बाप्पाच्या आगमनापूर्वी भजनी मंडळांना भेट

### मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते साहित्याचे वितरण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भजन परंपरेचे जतन, संवर्धन व्हावे आणि हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहचावा या उद्देशाने रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील ग्रामीण भागामधील भजनी मंडळांना शुक्रवारी (दि.११) साहित्याचे वितरण करण्यात आले. राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५०व्या जयंतीचे औचित्य साधून आणि आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पनवेलमध्ये उत्साहात पार पडला.

या सोहळ्याला भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, कमला देशेकर, निकिता खारकर, अनन्या गाताडे, प्राची जाधव, सोनाली जीतेकर, प्राची जाधव, नेहा पारंगे, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांच्यासह पदाधिकारी, मंडळांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री आशिष शेलार यांनी भजनाची परंपरा ही समाजाची खरी आवश्यकता आहे, असे सांगून ती जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने घेतलेल्या पुढाकाराबद्दल आणि राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर व सहकाऱ्यांचे कौतुक केले.

गणेशोत्सवात गावोगावी रात्रीच्या सुमारास भजनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा वेळी ग्रामीण भजनी मंडळांना या साहित्याची आवश्यकता असते. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा परिषदेने भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केल्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## पनवेल महापालिकेच्या नूतन महापौर निवासस्थानाचे लोकार्पण

■ भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने खारघर येथील सेक्टर २१मध्ये उभारण्यात आलेल्या 'शिवनेरी' या भव्य आणि अत्याधुनिक सोयीसुविधांयुक्त महापौर निवासस्थानाचे लोकार्पण भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते गुरुवारी (दि.१०) झाले. यावेळी त्यांनी महापौर नितीन पाटील यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्यास भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे व आमदार योगेश सागर, चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेलचे महापौर नितीन पाटील, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, मनपा आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, मधु पाटील, रवींद्र जोशी, अजय बहिरा, आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

### 'शिवनेरी'ची भव्यता आणि वैशिष्ट्ये

खारघर सेक्टर २१मधील भूखंड क्र. १५१ (१८०७.२२ चौमी) व १५१ए (७६५.५९ चौमी) अशा एकूण २५७२.८१ चौमी जागेवर महापौरांचे शिवनेरी हे निवासस्थान आकारास आले आहे. या वास्तूचे मुख्य बांधकाम क्षेत्रफळ १४०५.२८ चौमी असून यात प्रशासकीय व वैयक्तिक कामांचा उत्तम ताळमेळ साधण्यात आला आहे. सहा प्रशस्त बेडरुम, भव्य लिव्हिंग रूम, दोन सिट-आऊट, सुसज्ज किचन आणि महापौर कार्यालयासाठी स्वतंत्र ऑफिस स्पेस यासह अत्याधुनिक जिम एरिया, बेसमेंट पार्किंग, लिफ्ट, सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, मीटर रूम आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त असलेल्या महापौर निवासस्थानाच्या लोकार्पणामुळे पनवेल परिसराच्या वैभवात आणखी एका उत्तम वास्तूची भर पडली आहे.

## कर्जमुक्तीची दुसरी यादी प्रसिद्ध

रायगडातील १३७४ शेतकऱ्यांचा समावेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांची दुसरी यादी शुक्रवारी (दि.११) प्रसिद्ध करण्यात आली असून त्यामध्ये एक हजार ३७४ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे.

कर्जमुक्ती योजनेंतर्गत १ एप्रिल २०११ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत वितरित झालेली आणि ३० सप्टेंबर २०२५पर्यंत थकीत असलेली तसेच ३१ मार्च २०२६पर्यंत परतफेड न झालेली पीक कर्जे आणि पुनर्गठित अथवा फेरपुनर्गठित कर्जांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून शासनाने यासाठी महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने तयार केलेल्या योजना पोर्टलवर रायगड जिल्ह्यातील बँकांनी एकूण १२ हजार ६८२ थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. संगणकीय संस्करणानंतर आतापर्यंत सात हजार ३६७ पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पहिल्या यादीतील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आधार प्रमाणीकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी तीन हजार ३९२ पात्र लाभार्थ्यांना रु. २०.४६ कोटींची कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे. उर्वरित कर्जखात्यांचे प्रमाणीकरण व संबंधित कार्यवाही सुरू आहे.

योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची दुसरी यादी ११ सप्टेंबर रोजी शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली असून त्यामध्ये एक हजार ३७४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था तसेच ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही यादी कर्जमुक्तीची यादी असून यामधील पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी संबंधित यादीमध्ये आपले नाव तपासून आवश्यक ती आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

## लाइव्ह इव्हेंटसाठी 'एसओपी' जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

संगीत कार्यक्रम, सांस्कृतिक महोत्सव, क्रीडा स्पर्धा आणि प्रदर्शनांसह विविध 'लाइव्ह इव्हेंट'च्या परवानग्यांसाठी राज्य सरकारने प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) मंजूर केली आहे.

माहिती व जनसंपर्क विभागाच्या समन्वयाने ही व्यवस्था राबविली जाणार आहे. त्यामुळे विविध विभागांच्या परवानग्यांसाठी स्वतंत्र कार्यालयांत जाण्याऐवजी एकाच डिजिटल प्रणालीतून अर्ज, छाननी, मंजुरी आणि शुल्क भरण्याची प्रक्रिया होणार आहे.

## डॉ. उद्धव भंडारे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. उद्धव भंडारे लिखित 'भारत का आध्यात्मिक दर्शन और दार्शनिक चिंतन' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या हस्ते झाले.

सीकेटी महाविद्यालयात संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास शिक्षणतज्ज्ञ आणि कोल्हापूरमधील शिवाजी महाराज विश्वविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. अर्जुन चौहान विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते लेखक डॉ. भंडारे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी प्रा. डॉ. अर्जुन चौहान यांनी पुस्तकाचे कौतुक करताना भारतीय आध्यात्मिक आणि दार्शनिक चिंतनासारख्या व्यापक विषयाचा अभ्यास करून तो पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. भंडारे यांनी केले असल्याचे नमूद केले. लेखकाला पुढील लेखनासाठी प्रोत्साहन देताना त्यांनी "ही लेखणी थांबता कामा नये," असे आवर्जून सांगितले. डॉ. भंडारे यांनी सातत्याने लेखन करावे आणि त्यांच्या लेखनाचा लाभ विद्यार्थी व समाजाला मिळावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. (पान २ वर..)



**मुंबई : भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लालबागचा राजाची २०२६मधील पहिली झलक शुक्रवारी समोर आली. मंडळाचे यंदा ९३वे वर्ष आहे.**

## एमपीएससीच्या सचिवांना काळे फासले; तिघांना अटक

**नवी मुंबई : वार्ताहर**

नवी मुंबईतील बेलापूर येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे (एमपीएससी) सचिव महेंद्र हरपाळकर यांना संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी कार्यालयात घुसून काळे फासल्याची घटना शुक्रवारी (दि.११) घडली. या प्रकरणी नवी मुंबई पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे.

महेंद्र हरपाळकर हे एमपीएससीचे सचिव असून डिसेंबर २०२५पासून या पदावर कार्यरत आहेत. पेपरफुटीच्या मुद्द्यावरून संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी हरपाळकर यांच्या तोंडाला काळे फासले. यामुळे खळबळ उडाली. याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या घटनेनंतर नवी मुंबई पोलिसांनी कारवाई करीत योगेश पाटील, सुहास राणे आणि अण्णासाहेब सावंत यांना अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

॥ श्री गणेशाय नमः ॥
रामप्रहर




तुमचा लाडका बाप्पा झळकणार 'दै. रामप्रहर'मध्ये!

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे
सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!
आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहूद्या...
१५ ते २४ सप्टेंबर या कालावधीत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो 'रामप्रहर'मध्ये विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहेत.

बाप्पाचा फोटो इथे पाठवा
ई-मेल आयडी : ramprahar@gmail.com
व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक : ७७३८१०६००९

फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा
- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...
दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!

### निवडक

**नांदेड अपघात : मृतांचे कुटुंबीय, जखमींना पीएम मोदींकडून मदत**

**नवी दिल्ली :** नांदेड-भोकर मार्गावरील सीताखंडी घाट परिसरात गुरुवारी सायंकाळी प्रवासी वाहन टाटा मॅजिक आणि ट्रकची समोरासमोर धडक झाली. या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी आहेत. याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवेदना व्यक्त करून मृतांच्या निकटवर्तीयांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली आहे, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये दिले जाणार आहेत.

**भरती परीक्षा सुधारणांसाठी आज उच्चस्तरीय टास्क फोर्सचा संवाद**

**मुंबई :** राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी गठीत करण्यात आलेला उच्चस्तरीय टास्क फोर्स शनिवारी (दि. १२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे संवाद साधणार आहे. या भेटीदरम्यान विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच अन्य संबंधित हितधारकांशी संवाद साधून त्यांच्या सूचना, अडचणी व अभिप्राय जाणून घेतले जातील.

# पेणच्या बाप्पांना देश-विदेशातून मागणी

### तब्बल ७० लाखांहून अधिक मूर्तींची विक्री



**पेण : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे आणि या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील गणेशमूर्तींचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पेण तालुक्यातील मूर्तींना देश-विदेशातून प्रचंड मागणी आली आहे. यंदाच्या हंगामात पेणमधून सुमारे ७० लाखांपेक्षा जास्त गणेशमूर्तींची विक्री झाली आहे. विशेष म्हणजे यातील तब्बल १५ ते २० लाख मूर्ती थेट परदेशांतील बाजारपेठेत पाठवण्यात आल्या आहेत.

कच्च्या मालाचे भाव वाढल्यामुळे यंदा गणेशमूर्तींच्या दरात १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली होती, मात्र असे असूनही गणेशभक्तांच्या उत्साहात कोणतीही कमतरता दिसून आली नाही. मोठ्या प्रमाणात ऑर्डर्स नोंदवण्यात आल्या. स्थानिक मूर्तिकार व विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार यंदा कापडाचा वापर करून तयार केलेल्या विशेष आकर्षक गणेशमूर्तींना ग्राहकांची सर्वाधिक पसंती मिळाली.

पेणमध्ये तयार होणाऱ्या गणेशमूर्ती केवळ महाराष्ट्रात किंवा भारतातच नाही, तर अमेरिका, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि वेस्ट इंडिज यांसारख्या विविध देशांमध्ये पाठवल्या जातात. परदेशातील निर्यातीची तयारी दरवर्षी जानेवारी महिन्यापासूनच सुरू होते आणि ती जूनपर्यंत चालते. त्यानंतर स्थानिक आणि देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यावर भर दिला जातो.

अलीकडच्या वर्षांत थायलंड, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, मलेशिया, इंडोनेशिया, मॉरिशस अशा अनेक देशांमध्ये पेणच्या मूर्तींची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

### २० लाख बाप्पा परदेशात रवाना

*परदेशात राहणाऱ्या मराठी आणि भारतीय नागरिकांमुळे पेणच्या गणेशमूर्तींची लोकप्रियता जागतिक स्तरावर सातत्याने वाढत आहे. यंदा सुमारे २० लाख मूर्ती परदेशांमध्ये रवाना झाल्या आहेत. आखाती देशांमधील युद्धजन्य व तणावाच्या परिस्थितीमुळे जहाजांच्या वाहतुकीला काही काळ विलंब झाला होता, परंतु काही दिवसांतच परिस्थिती निवळल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरळीत झाली आणि लाखो गणेशमूर्ती सुरक्षितपणे परदेशांतील भक्तांपर्यंत पोहचल्या आहेत.*

# कोयना पुनर्वसित २२ गावांच्या नागरी सुविधांना मिळणार गती

## मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघातील कोयना प्रकल्पामुळे बाधित होऊन पुनर्वसित झालेल्या २२ गावांमधील प्रलंबित नागरी सुविधांची कामे मार्गी लावावेत असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिले.

मंत्रालयात कर्जत येथील कोयना पुनर्वसित २२ गावांच्या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली त्यावेळी मंत्री मकरंद जाधव पाटील बोलत होते.यावेळी रायगडचे पालकमंत्री भरत गोगोवले, आमदार महेंद्र थोरवे, अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाचे आनंद मरागजे, कर्जतचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित पुनर्वसित गावांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध




करून देण्यासाठी शासनाने 7 एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृती कार्यक्रमास मान्यता दिली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील खालापूर, पेण व रोहा तालुक्यांतील पुनर्वसित गावांमध्ये प्रलंबित नागरी सुविधा पुरविण्यासाठी ३९.३१ कोटी रुपयांची तरतूद दर्शविण्यात आली आहे.

या कृती कार्यक्रमानुसार खालापूर तालुक्यातील पुनर्वसित गावांमधील २७ नागरी सुविधा कामांसाठी १९ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. या अंदाजपत्रकातील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आले आहे. ७ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये आखण्यात आलेल्या कृती आराखड्यात समाविष्ट नसलेल्या १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित पुनर्वसित गावांचाही समावेश करण्यासाठी कृती आराखड्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे.त्यानुसार ही कार्यवाही करण्यात येईल.पुनर्वसित गावांतील नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने गती देण्यात यावी अशा सूचना त्यांनी केल्या.

कोयना प्रकल्पग्रस्तांच्या वसाहतींचे प्रश्न, पर्यायी शेत जमिनीचे वाटप, कोयना प्रकल्पग्रस्तांच्या व साहित्य नागरिक सुविधा पुरवणे, पुनर्वसन वसाहती ना महसुली गावठाण जाहीर करणे, प्रकल्पग्रस्तांना विविध दाखल्यांचे वितरण करणे याबाबत आढावा घेण्यात आला.

# गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी झाल्यास पर्यायी मार्गांचा करा वापर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणाकडे जाणाऱ्या गणेशभक्तांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ तसेच पाली फाटा (खोपोली)-वाकण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ (अ) वरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक नियंत्रण व पर्यायी मार्गांची अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

मुंबई, नवी मुंबई, ठाणे व पालघर परिसरातील गणेशभक्त गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने आपल्या मूळ गावी, तळ कोकणात जात असतात. त्यामुळे दि. १४ सप्टेंबर रोजीच्या गणेश प्रतिष्ठापना तसेच त्यानंतरच्या कालावधीत महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी झाल्यास वाहनचालकांनी प्रशासनाने निश्चित केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वाहतूक कोंडी झाल्यास पर्यायी मार्ग



पुढीलप्रमाणे : पेण येथे कोंडी झाल्यास-तरणखोपपेण बायपासगागोदेवरसईपाली फाटापरळीजांभुळपाडापालीवाकण. वडखळ येथे कोंडी झाल्यास-वडखळ-पोयनाडपेझारी चेकपोस्टकुडूस नागोठणे वाकण.नागोठणेयेथेकोंडी झाल्यास:नागोठणेवेलशेत फाटावरवठणेभिसेखिंडवाकण. नागोठणेवेलशेत फाटावरवठणेभिसखिंडरोहावाकण.

वाकण-नागोठणे येथे कोंडी झाल्यास : वाकणपालीनांदगावविळेसुतार वाडीकोलाड. वाकणपालीनांदगावविळेनि जामपूरमाणगाव. वाकणपालीनांदगावविळे निजामपूर माल्याची वाडी बोरवाडीजांभुळवाडीढालघर.

कोलाड येथे कोंडी झाल्यास :कोला डसुतारवाडीविळेनिजामपूरमाणगाव.माणग ाव येथे कोंडी झाल्यास :माणगावनिजापूर नाकासाईराम हॉटेल ब्रिजमुगवली ब्रिज.लोणेरे येथे कोंडी झाल्यास :लोणेरेगोरेगावनांदवीआंबेतम्हाप्रळ. राजेवाडी फाट्यापुढे पोलादपूरच्या दिशेने कोंडी झाल्यास : टोळफाटा (महाड)आंबेतम्हाप्रळ.ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ११ सप्टेंबर पासून दि. २६ सप्टेंबर २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.

दरम्यान, जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, अग्निशमन वाहने, रुग्णवाहिका, शासकीय वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना ही अधिसूचना लागू राहणार नाही.गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांनी वाहतूक कोंडीच्या परिस्थितीत प्रशासनाने सुचविलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सिडकोच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातील ४,७७९ सदनिकांची संगणकीय सोडत



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या "माझे पसंतीचे सिडकोचे घर - माझा 1st चॉइस" गृहनिर्माण योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बलघटकाच्या ४,७७९ सदनिकांची संगणकीय सोडत शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी सिडको भवन,सीबीडी बेलापूर येथे झाली.

यावेळी शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख,सहव्यवस्थापकीय संचालक, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी लक्ष्मीकांत गरजे, संचालक (आयटी),एनआयसी, नरेंद्र भामरे, संचालक (आयटी), एनआयसी; श्रीनिवास मोकळीकर, पणन व्यवस्थापक(गृहनिर्माण) तसेच सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सिडकोतर्फे दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला होता. या योजनेअंतर्गततळोजा सेक्टर-३९ येथे ४,२२९, कळंबोली बस डेपो येथे २५७ आणि खारघर बस डेपो येथे २९३ सदनिकाआर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. योजनेतील काही सदनिका या दिव्यांग अर्जदारांसाठी राखीव होत्या. या संगणकीय सोडतीमध्ये एकूण ३,१४२ अर्जदार विजेते ठरले आहेत. सोडतपूर्णतः पारदर्शक व मानवी हस्तक्षेपविरहित पद्धतीने पार पडली असून यशस्वी अर्जदारांची यादीwww.cidcohomes.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या गृहनिर्माण योजनेद्वारे विजेत्या अर्जदारांचे नवी मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरात घर घेण्याचेस्वप्न साकार झाले आहे.

# गणेशभक्तांसाठी आरटीओची टोलपास सुविधा

## खारघर येथील कार्यालयात सुट्टीच्या दिवशीही मोफत पास वितरणाची सोय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या हलक्या मोटारींना टोलनाक्यावर सवलत मिळावी यासाठी पनवेल परिवहन विभागाने हलक्या मोटारमालकांसाठी झटपट ऑनलाइन पास काढण्याची सुविधा सुरू केली आहे. वाहनमालकांना आरटीओ कार्यालयात वारंवार येण्याची गरज भासू नये आणि टोलनाक्यावर पासासाठी अधिक वेळ थांबावे लागू नये, यासाठी rtopanvel.tectignis.in या संकेतस्थळावरून अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत १०० हून अधिक वाहनमालकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. सुट्टीच्या दिवसांमध्येही खारघर येथील व्हॅलीशिल्प सोसायटीतील पनवेल आरटीओचे कार्यालयात मोफत पास मिळण्यासाठीची सुविधा सुरू ठेवण्यात आली आहे. पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना या सुविधेमुळे पास मिळविण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे. वाहनमालकांनी संकेतस्थळावर वाहन क्रमांक, वाहनमालकाचे नाव, प्रवासाचा टप्पा,




प्रवासाची तारीख आणि वेळ यांसह वाहनाचे आरसी, विमा आणि पीयूसीची कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करावीत.

पनवेल आरटीओ कार्यालयात या सुविधेची माहिती देणारी मराठी आणि इंग्रजी भाषेतील भित्तिपत्रके लावण्यात आली आहेत. त्यावरील क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर वाहनमालकांना ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. अर्जाची नोंदणी केल्यानंतर त्या अर्जाची प्रत तसेच ऑनलाइन जोडलेल्या वैध कागदपत्रांची दुय्यम प्रत घेऊन खारघर येथील पनवेल आरटीओ कार्यालयातील अनुज्ञप्ती विभागात जमा करावी लागणार आहे.

ऑनलाइन अपलोड केलेल्या कागदपत्रांवरील तारखा किंवा अन्य महत्त्वाच्या नोंदी स्पष्ट दिसत नसल्यामुळे प्रत्यक्ष आरटीओ कार्यालयात जाऊन या कागदपत्रांची दुय्यम प्रत द्यावी लागणार आहे. त्यामुळे वाहनमालकांनी मूळ कागदपत्रांसह त्यांची दुय्यम प्रत घेऊन येण्याचे आवाहन आरटीओ मार्फत करण्यात आले आहे. मूळ कागदपत्रांची पडताळणी लगेच झाल्यानंतर संबंधित वाहनमालकाला पास देण्याची व्यवस्था खारघर येथील आरटीओ कार्यालयात करण्यात आली आहे.

> **गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनमालकांची गैरसोय टाळण्यासाठी ऑनलाइन टोलपासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाहनमालकांनी त्याचा लाभ घ्यावा. वाहनमालकांनी प्रवासापूर्वी ऑनलाइन अर्ज करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि त्यानंतर मूळ कागदपत्रांसह आरटीओ कार्यालयात पडताळणी करून घ्यावी. त्यामुळे टोलनाक्यावर होणारा विलंब टाळता येईल आणि गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुलभ होईल.**
> **-जयंत चव्हाण,**
> प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल

गणेशभक्तांची गैरसोय टाळण्यासाठी शनिवारी व रविवारीही पास देण्यासाठी आरटीओ कार्यालयाकडून अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे कोकणाकडे जाण्यापूर्वी वाहनमालकांनी ऑनलाइन अर्ज करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेशोत्सव काळात माणगाव-इंदापूर येथे 'नो पार्किंग झोन'

**माणगाव : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 वर वाहतूक कोंडी होऊ नये तसेच वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहावी, यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाने माणगाव व इंदापूर येथील महामार्गालगतच्या काही भागात दोन्ही बाजूंनी 'नो पार्किंग झोन' घोषित केला आहे.

मुंबई, नवी मुंबई, ठाणे व पालघर परिसरातील गणेशभक्त मोठ्या संख्येने गणेशोत्सवासाठी कोकणातील आपल्या मूळ गावी जातात. यामुळे गणेशोत्सवाच्या कालावधीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर वाहनांची मोठी वर्दळ वाढते. त्यातच दि. ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान मोठ्या संख्येने एस.टी. बसेस कोकणाकडे रवाना होणार असल्याने महामार्गावर वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

माणगाव व इंदापूर येथील बाजारपेठा मुंबई-गोवा महामार्गावर असल्याने या ठिकाणी नेहमीच वाहतुकीची मोठी वर्दळ असते. त्यामुळे वाहतूक कोंडीबरोबरच अपघाताची शक्यताही लक्षात घेऊन ही उपाययोजना करण्यात आली आहे.

माणगाव येथील- रेड्डीज हॉटेल ते ढालघर फाटा, निजामपूर नाका ते कालवा रोड, मोर्बा नाका ते पवार वाडा हॉटेल तसेच इंदापूर येथील- माहि हॉटेल ते कशेणे बायपास या मार्गांवर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी 'नो पार्किंग झोन लागू करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड-अलिबाग यांच्या अहवालाच्या आधारे महाराष्ट्र शासन गृहविभागाच्या अधिसूचनेनुसार पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी हा आदेश जारी केला आहे.

ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे. दरम्यान, जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, अग्निशमन वाहने, रुग्णवाहिका, शासकीय वाहने, इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच व्यवस्थापनाच्या अधिकृत पासधारक वाहनांना या आदेशातून वगळण्यात आले आहे.

गणेशभक्त व वाहनचालकांनी प्रशासनास सहकार्य करून निर्धारित ठिकाणी वाहने पार्क न करता वाहतूक सुरळीत ठेवण्यास सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाने केले आहे.

# शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद

## नवी मुंबई महापालिकेकडून कार्यवाही

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरी भागात अतिशय दाटीवाटीने वसलेल्या तसेच झोपडपट्टी सदृश्य भागात आरोग्य सेवांपासून नागरिक वंचित राहू नयेत यादृष्टीने प्राथमिक आरोग्य संस्थांना सक्षम करण्यासाठी तसेच सातत्यपूर्ण रितीने गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी केंद्र शासनाकडून १५व्या वित्त आयोगांतर्गत राज्य स्तरावर शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रे मंजूर करण्यात आली आहेत.

यानुसार शासनाकडून नवी मुंबई महानगरपालिकेस ५९ शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रे मंजूर करण्यात आलेली असून नमुंमपा कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ५९ शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. याव्दारे विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे निरीक्षण आणि नियंत्रण करण्यासाठी तसेच सुलभ व परवडणारी आरोग्य सेवा प्रदान करुन आरोग्य निर्देशांक वाढविण्याचे उद्दिष्ट साध्य होताना दिसत आहे.

या शहरी आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये डॉक्टर, नर्स, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी उपलब्ध असून सकाळी ११ ते सायं. ७ या वेळेत नागरिक येथील आरोग्य सुविधेचा लाभ घेऊ शकतात.या केंद्रामार्फत नागरिकांना विविध आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यामध्ये -

(१) गरोदरपण आणि बाळंतपणातील काळजी

(२) नवजात शिशू आणि बाळांच्या



आरोग्य सेवा

(३) बालके व किशोरवयीन यांच्या आरोग्य सेवा

(४)असंसर्गजन्य रोगांची तपासणी, प्रतिबंध, नियंत्रण आणि व्यवस्थापन

(५)मुलभूत मौखिक आरोग्य सेवा- अशा विविध आरोग्य सेवांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे, संसर्गजन्य आजारांपासून बचाव कसा करावा, वैयक्तिक स्वच्छता आणि पोषणाचे महत्त्व याबद्दलही नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण केली जाते.

या आरोग्यवर्धिनी केंद्रांमुळे नागरिकांना त्यांच्या घारापासून जवळ प्राथमिक आरोग्य सेवा सहज उपलब्ध होत असल्याने या केंद्रांना चांगला प्रतिसाद लाभताना दिसत आहे. तरी नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

पान १ वरुन

### पनवेल महापालिकेच्या नूतन महापौर निवासस्थानाचे लोकार्पण

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पनवेल महापालिकेने गेल्या १० वर्षांत अनेक लहान मोठे प्रकल्प आणि विकासकामे साकारली आहेत. यामध्ये भव्यदिव्य महापौरांचे निवासस्थान खारघरमध्ये उभारले जाणे ही आनंदाची बाब आहे. पनवेल क्षेत्राचा विकास करण्यासाठी लोकप्रतिनिधी तसेच पनवेल महापालिकेचे अधिकारी सर्वजण कटिबद्ध आहेत. महापौर निवासस्थान प्रकल्पासाठी तत्कालीन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनीही मोलाची भूमिका बजावल्याचे सांगत महापालिकेच्या जडणघडणीमध्ये दिलेल्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले.

महापौर नितीन पाटील यांनी या प्रकल्पामुळे समाधान व्यक्त करताना पनवेल महापालिकेचे एक-एक प्रकल्प मार्गी लागत असल्याचे सांगितले. ते म्हणाले, आज पनवेल महापालिका ड वर्गातील महापालिका असली तरी भविष्यात एमएमआर क्षेत्रातील मुंबईनंतरची सर्वात मोठी महापालिका म्हणून नावारूपास येईल. लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ, आंतरराष्ट्रीय दर्जाचे रेल्वेस्थानक आणि समृद्धी महामार्गाचे जंक्शन यामुळे पनवेल परिसराचा वेगाने विकास होणार आहे. येत्या १० वर्षांत अत्यंत वेगाने विकसित होणारी महापालिका म्हणून पनवेलचा लौकिक निर्माण होईल, असा विश्वासही महापौर पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापौर निवासस्थानाच्या वास्तुरचनेत योगदान देणारे वास्तुविशारद, कंत्राटदार तसेच वास्तुविशारद व नगरसेविका रूचिता लोंढे यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांचे आभार अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी मानले.

### डॉ. उद्धव भंडारे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

अध्यक्षीय मनोगतात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डॉ. भंडारे यांचे पुस्तक लेखनाबद्दल अभिनंदन करून पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "डॉ. भंडारे यांनी अतिशय चांगले पुस्तक लिहिले आहे. त्यांनी यापुढेही असेच लेखन करावे. आमचा पाठिंबा आणि आशीर्वाद सदैव त्यांच्या पाठीशी आहे," असे त्यांनी सांगितले.

आपल्या मनोगतात लेखक डॉ. भंडारे यांनी हे पुस्तक केवळ साहित्यकृती नसून भारताला समजून घेण्याचा, भारताच्या विचारपरंपरेचा मागोवा घेण्याचा आणि त्यातून माणसाला समजून घेण्याचा एक छोटासा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले. भारताला केवळ भौगोलिक सीमांच्या माध्यमातून समजून घेता येणार नाही; त्यासाठी भारताच्या विचारांमध्ये, तत्त्वज्ञानात, संतपरंपरेत आणि जीवनदृष्टीत उतरावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

वेद-उपनिषदांपासून गौतम बुद्ध, भगवान महावीर, संत कबीर, संत तुकाराम, स्वामी विवेकानंद, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंतच्या भारतीय चिंतनपरंपरेचा संदर्भ देत त्यांनी या ज्ञानपरंपरेचे व्यापक स्वरूप अधोरेखित केले.

यावेळी विद्यार्थिनी सुकेशनी जाधव, संजना पाटील, अमित सिंह, राजवन आणि गौरीका यांनी पुस्तकाविषयी आपले अभिप्राय व्यक्त केले. कार्यक्रमास वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. सुधाकर यादव, ग्रंथपाल रमाकांत नवघरे, अकाउंट विभागप्रमुख डॉ. नीलेश कोळी तसेच राजवन व बिश्राम एकंबे, महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन पीएचडी प्राप्त विद्यार्थिनी डॉ. सुप्रिया सिंह यांनी केले, तर उपस्थितांचे आभार लेखक डॉ. भंडारे यांनी मानले.

### गणपती उत्सवानिमित्त मोहोपाडा बाजारपेठ सजली

**रसायनी : प्रतिनिधी**

आज मोहोपाड्यातील बाजारपेठेमध्ये गणपतीच्या मूर्ती लाईटचे विविध आकर्षक माळा तसेच प्लास्टिक फुले सजावट साहित्य यामध्ये सर्व ग्राहकांची धावपळ पहायला मिळते आहे आरास व त्याची दुकाने विविध रंगांच्या फुलांची माळ फळे फुले व आणि इतरसजावटीचे सर्व सामान यामध्ये मोहोपाडा बाजार सजलेली आहे तसेच गणपती खरेदी कपडे किराणा दुकान लाईटचे दुकान यामध्ये गर्दी दिसत आहे आणि मोहोपाडा मार्केट यामुळे वाहतूक कोंडी पण होत आहे गणपतीचे लगबग जोरदार चालू असून सर्वांची सर्व भाविकांची सर्व ग्राहकांची व सर्व सर्वांचे धावपळ पहायला मिळाले आहे.

# लोककल्याण मेळाव्यात विविध शासकीय योजनांची माहिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा अधिक व्यापक लाभ पोहोचविणे, नव्या पथविक्रेत्यांचा समावेश करणे, वित्तीय व्यवहारास चालना देणे तसेच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत गुरुवारी (दि. १०) कळंबोली प्रभाग कार्यालय येथे लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.



उपमहापौर प्रमिला पाटील, प्रभाग अ चे सभापती रवींद्र भगत, नगरसेविका सरस्वती काथारा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा घेण्यात आला. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील म्हणाल्या की, कळंबोलीमधील फेरीवाल्यांनी सर्वांगीण विकासाकरिता पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेचा लाभ घ्यावा. शासन विविध योजनांच्या माध्यमातून फेरीवाल्यांना शाश्वत उपजीविकेचे साधन मिळवून देण्याकरिता सहकार्य करीत आहे. या सर्व योजनांचा लाभ फेरीवाल्यांनी घ्यावा, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ बडोदा यांचे प्रतिनिधी या मेळाव्यास उपस्थित होते. त्यांनी शासनाच्या विविध योजनांबाबत उपस्थितांना माहिती दिली. उपायुक्त अभिषेक पराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मेळावा घेण्यात आला. मेळाव्याकरिता सहायक आयुक्त डॉ. रूपाली माने यांनी सहकार्य केले. प्रास्ताविकामध्ये व्यवस्थापिका विनया म्हात्रे यांनी पनवेल पालिकेकडून प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधीअंतर्गत आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा सादर केला. मेळाव्यात नवीन अर्ज भरणाऱ्यांची नोंद करण्यात आली. तसेच फेरीवाल्यांकरिता आयुष्मान कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. आभार प्रदर्शन व्यवस्थापक नवनाथ थोरात यांनी केले. विभागप्रमुख जयराम पादीर, दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# कामोठ्यात बेकायदा जाहिरात फलकांवर महापालिकेचा हातोडा

**पनवेल : वार्ताहर**

महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता कामोठे परिसरात जाहिरात व डिजिटल फलक लावणाऱ्या सात आस्थापनांविरोधात पनवेल महापालिकेने फौजदारी कारवाई केली आहे. प्रशासनाने वारंवार सूचना करूनही विनापरवानगी फलक लावल्याचे निदर्शनास आल्यानंतर अतिक्रमण नियंत्रण विभागाने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

प्रभाग समिती 'क'च्या हद्दीत कामोठे परिसराचा समावेश असून शहरात जाहिरात किंवा डिजिटल फलक उभारण्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. याबाबत महापालिकेने प्रसिद्धिपत्रकाद्वारे नागरिक तसेच व्यावसायिकांना यापूर्वीच सूचना दिल्या होत्या. महापालिकेच्या पथकाने १४ ऑगस्ट ते ९ सप्टेंबरदरम्यान कामोठे परिसरात पाहणी केली. विस्टा कॉर्नर तसेच एल. जी. शोरूम ते मानसरोवर रेल्वेस्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावरील दुभाजक व रस्त्याच्या कडेला काही फलक विनापरवानगी उभारण्यात आल्याचे आढळले. अतिक्रमण पथकाने ते फलक हटवून सात आस्थापनांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## वाहनाच्या धडकेत महिला वकिलाचा मृत्यू

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगतच्या सेवा रस्त्यावर चालण्यासाठी गेलेल्या ३२ वर्षीय महिला वकिलाला भरधाव वाहनाने धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अपघातानंतर जखमी महिलेला कोणतीही वैद्यकीय मदत न करता वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी आंतरराष्ट्रीय विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

प्रिया गोस्वामी (रा. द्वारका शिवम सोसायटी, सेक्टर २ ए, करंजाडे) असे मृत महिलेचे नाव आहे. प्रिया वकिलीची प्रॅक्टिस करीत होत्या.

## रिक्षाचालकाच्या निष्काळजीपणामुळे दुचाकीस्वार झाला जखमी

**पनवेल : वार्ताहर**

जुन्या पुणे-मुंबई मार्गावर इंडियन कोस्टगार्ड इमारतीसमोरील रस्त्यावर रिक्षाचालकाने निष्काळजीपणे अचानक वळण घेतल्याने दुचाकीला धडक बसून दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार जयेश बाळाराम पाटील रा. पळस्पे, पनवेल हे त्यांच्या ताब्यातील होंडा शाइन दुचाकी घेऊन आष्टे गावाकडून पनवेलच्या दिशेने येत होते. सायंकाळी सुमारे ४.५० वाजण्याच्या सुमारास ते इंडियन कोस्टगार्ड इमारतीसमोरील महामार्गावर आले. त्यावेळी रस्त्याच्या उजव्या बाजूला असलेल्या रिक्षाचालकाने प्रवासी घेण्यासाठी डाव्या बाजूकडून अचानक वळण घेतले. दरम्यान, वळण घेत असताना रिक्षाचालकाने योग्य इंडिकेटर न दिल्याने तक्रारदारांच्या दुचाकीला रिक्षाची जोरात धडक बसली. या अपघातात जयेश पाटील जखमी झाले. सदर अपघातानंतर रिक्षाचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# गव्हाण विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षक-पालक सहविचार सभा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी शुक्रवारी (दि.११) शिक्षक-पालक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, प्रथम घटक चाचणी परीक्षेचा निकाल, एचएससी बोर्ड परीक्षेचे अर्ज भरणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिस्त, अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष तसेच मोबाइलच्या दुरुपयोगासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सभेत सखोल चर्चा करण्यात आली.



सभेच्या प्रारंभी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी प्रास्ताविकातून उपस्थित पालकांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत शाळा आणि पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रथम घटक चाचणी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. यानंतर ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. संजय उगले यांनी बारावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि भावी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

एचएससी बोर्ड परीक्षेचे अर्ज भरण्याबाबत आवश्यक माहितीही पालकांना देण्यात आली. सभेच्या निमित्ताने स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांनी पालकांशी थेट संवाद साधला. पालकांच्या अपेक्षा, अडचणी जाणून घेत त्यांनी पालक-पाल्यांमधील संवाद आणि घरातील शैक्षणिक वातावरण यांचे महत्त्व अधोरेखित केले.


यावेळी पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या पाल्यांच्या अभ्यासासंदर्भातील अडचणी, शंका आणि अपेक्षा मोकळेपणाने मांडल्या. सभेचे अध्यक्ष ज्युनिअर कॉलेज कमिटीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी अध्यक्षीय मनोगतात बारावीचे वर्ष विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे असून या वर्षातील सातत्यपूर्ण मेहनत त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीला दिशा देणारी ठरणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे गांभीर्याने व जागरूकतेने पाहावे. वेळेचा योग्य उपयोग करावा आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच चालू शैक्षणिक वर्षात बारावीचा निकाल शंभर टक्के लागण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक-प्राध्यापकांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन करीत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

सदस्य ॲड. राहुल घरत, विजयशेठ घरत, स्कूल कमिटी सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे तसेच ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक वृंद करुणा तांडेल, सोनटक्के सर, माणिक घरत, अर्चना पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन दर्शना माळी, तर आभार प्रदर्शन ज्युनिअर कॉलेज विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक राजेंद्र चौधरी यांनी केले.

# 'सीकेटी'त हिंदी भाषा दिवस उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

१४ सप्टेंबर हा राष्ट्रीय हिंदी दिवस गणेशोत्सव सुट्टीमुळे ११ सप्टेंबरला सीकेटी विद्यालयात जल्लोषात साजरा झाला. यावेळी चांगू काना ठाकूर उच्च महाविद्यालयाच्या हिंदी विषय प्राध्यापिका डॉ. गितिका तन्वर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. विद्यालयाची माजी विद्यार्थिनी आणि प्लेसमेंट ऑफिसर श्रुती कोळी, पनवेल प्रभाग क्रमांक ९च्या नगरसेविका प्रतिभा भोईर कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिल्या. विद्यालयातील संगती शिक्षक रूपेश मढवी, तबलावादक संतोष खैरे यांनी आणि विद्यार्थी गायकवृंदांनी सुरेल गणेशवंदना सादर केली.



प्रमुख अतिथींचा परिचय हिंदी विभागप्रमुख शशिकला पाटील यांनी करून दिला. यावेळी "हिंदी की अदालत" विषयावर आधारित नाटक तसेच राजस्थानी नृत्य असे अप्रतिम कार्यक्रम शशिकला पाटील व इतर हिंदी शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले गेले. हिंदी कविता गायन तसेच हिंदी भाषाविषयक भाषण यांचे उत्कृष्ट सादरीकरण विद्यार्थ्यांनी करून उपस्थितांची मने जिंकली. शिक्षिका सरोज जितेकर, गायत्री पाटील, वर्षा वारे, प्राची इसे, पूर्वा खेडेकर, रुपाली शेंडे, शशिकला पाटील यांनीही या दिनाचे औचित्य साधून सुरेल असे भक्तीगीत सादर केले.

सहशिक्षिका रुपाली शेंडे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्या डॉ. गीतिका तन्वर यांनी सांगितले की, हिंदी एक जीवनावश्यक भाषा तर आहेच परंतु आज सामान्य व्यवहारापासून ते चित्रपटसृष्टीपर्यंत सगळीकडे हिंदीचाच बोलबाला आहे. त्यामुळे ती राष्ट्रीय भाषा असल्याचा अभिमान असलाच पाहिजे, परंतु म्हणून इतर भाषांना कमी लेखता कामा नये. मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी प्रमुख अतिथी यांची प्रशंसा केली. आपल्या मागदर्शनपर भाषणात हिंदी विभागप्रमुख शशिकला पाटील आणि हिंदी विभागातील सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

प्रगती जाधव व ईशानी, प्रणाली, सौम्या व समृद्धी या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम शिस्तीत पार पाडण्यात प्रमोद शेळके यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रगती जाधव यांच्या आभार प्रदर्शनाने व रुपेश मढवी यांच्या वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, सर्व हिंदी विभाग शिक्षक, इयत्ता नववीचे विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. प्राची इसे आणि पूर्वा खेडेकर या शिक्षकांनी कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले.



**पनवेल : आदित्य ग्राफिक्स (उलवे) यांच्या आरती संग्रहाचे प्रकाशन शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, चेअरमन व ज्येष्ठ भाजप नेते वाय.टी. देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी बाबूराव देशमुख, देशमुख मराठा समाज अध्यक्ष किरण देशमुख, भाजप ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, गव्हाण ग्रामपंचायत सदस्या उषा देशमुख, जासई हायस्कूलचे मा. प्राचार्य अरुण घाग, ज्येष्ठ शिक्षक नूरा शेख, उलवे भाजप युवा अध्यक्ष विराज देशमुख, राकेश देशमुख (आदित्य ग्राफिक्स), नरेंद्र देशमुख, आदित्य देशमुख आदी उपस्थित होते.**



**पनवेल : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाजप युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष विश्वास म्हात्रे, हरिग्राम ग्रामपंचायतीचे सदस्य श्रीनिवास म्हात्रे आणि भाजपचे पनवेल शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने आरती संग्रह प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्याचे प्रकाशन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. यावेळी अजय जमादार, नरहरी वायकर, शत्रुघ्न पंडित, राजाराम काळे आदी उपस्थित होते.**

# गव्हाण विद्यालयात विद्यार्थिनींसाठी मानसिक आरोग्य मार्गदर्शन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

किशोरावस्था मुलींच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा असून या काळात होणाऱ्या शारीरिक, मानसिक, भावनिक बदलांमुळे भीती, न्यूनगंड व ताणतणाव निर्माण होऊ शकतो. विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढवून भावनिकदृष्ट्या सक्षम करणे तसेच ताणतणावाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकता असते. याच उद्देशाने महाराष्ट्र महिला व बालविकास आयोगाच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण येथे १० सप्टेंबरला किशोरवयीन मुलींसाठी मानसिक आरोग्य व ताणतणाव व्यवस्थापन मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.



प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित उपक्रमात माध्यमिक विभागातील इयत्ता नववी-दहावीच्या विद्यार्थिनी तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी-बारावीच्या विद्यार्थिनींना स्वतंत्र सत्रांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. माध्यमिक विभागातील १५६, तर कनिष्ठ महाविद्यालय विभागातील ८२ विद्यार्थिनींनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला. माध्यमिक विभागासाठी वाईसा टीमच्या मानसी चक्रदेव-कम्युनिटी सायकॉलॉजिस्ट, श्रुती पासलकर-कम्युनिटी सायकॉलॉजिस्ट, ऋषिकेश मानकर व सागर वानखेडे-प्रोग्राम ऑफिसर यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. मानसी चक्रदेव यांनी चुटकी वाजवून टाळ्या वाजविण्यासारख्या कृतीतून विद्यार्थिनींचे लक्ष केंद्रित केले. खेळीमेळीच्या वातावरणातून एकाग्रता, मेडिटेशन कसा वाढवावा याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

श्रुती पासलकर यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांच्या मनातील विचार जाणून घेतले. प्रश्न विचारून उत्तरे घेत हितगुज साधण्यात आले.

'ड्रीम किट' तसेच 'मनाशी गट्टी, विचारांची गट्टी' हे पुस्तक देण्यात आले. ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थिनींसाठी मानसशास्त्र तज्ज्ञ काव्य मिरगु व भूषण राजपूत (एम.एस.डब्ल्यू.) यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे व पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांची उपस्थिती होती. मार्गदर्शकांचे स्वागत व सूत्रसंचालन हर्षाला पाटील यांनी केले, तर ज्युनिअर कॉलेज विभागातील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. करुणा तांडेल यांनी केले.

## तळोजात टँकरच्या धडकेत तरुण ठार

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील आयजीपीएल फाट्याजवळ भरधाव टँकरने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला. मंगळवारी सकाळी पोलीस चौकीसमोर हा अपघात झाला.

याप्रकरणी तळोजा पोलिसांनी टँकरचालकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात राहुल यादव याचा मृत्यू झाला. तो तोंडरे गावात राहत असून खोणी येथील एका गोदामात पर्यवेक्षक म्हणून काम करीत होता. त्याच गोदामात काम करणारा रोहन मुंबईकर याच्यासोबत राहुल दुचाकीवरून खोणीच्या दिशेने जात होता. आयजीपीएल फाट्याजवळ पोहोचले असता पाठीमागून आलेल्या भरधाव टँकरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

दरम्यान, या धडकेत राहुल याचा जागीच मृत्यू झाला, तर रोहन गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच तळोजा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असून, टँकरचालकाला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

# गणेशोत्सवासाठी वाहतूक नियोजन

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सव काळात पनवेल बाजारपेठेतील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलीस, महापालिका, लोकप्रतिनिधी आणि गणेशोत्सव मंडळांच्या समन्वयातून नियोजन करण्यात आले आहे.

फडके नाट्यगृहासमोरील मराठी शाळा, नवीन तहसील कार्यालय, टपाल नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या मागील व समोरील जागा, कर्नाळा सर्कलजवळील जागा, लाईन आळी रोडवरील विलास कोठारी यांच्या जागेतील परिसर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागील डी. एड्. कॉलेजसमोरील मोकळी जागा वाहनतळासाठी उपलब्ध करण्यात आली आहे. गर्दीनुसार एकेरी वाहतूक, सम-विषम पार्किंग आणि बॅरिकेडिंगची व्यवस्था करण्यात येणार असून उरण नाका ते टपाल नाका परिसरातील व्यापाऱ्यांसाठी जड व अवजड वाहनांमधून माल चढ-उतार करण्यासाठी दुपारी १ ते ४ ही वेळ निश्चित करण्यात आली आहे.

पनवेल बाजारपेठेतील रस्ते व पदपथांवरील अतिक्रमणे, कचरा तसेच रस्त्याच्या कडेला ठेवण्यात आलेले साहित्य हटविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शुक्रवारी वाहतूक पोलिसांनी याबाबत कारवाई सुरू केली. ही बाब महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने प्रभाग अधिकाऱ्यांना पथक पाठवून कारवाईचे आदेश दिले. गणेशोत्सव बंदोबस्तासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेचे ७० कर्मचारी आणि सात अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच पनवेल महानगरपालिकेकडे नवी मुंबई पोलिसांनी अतिरिक्त ५० वॉर्डनची मागणी केली आहे.

प्रमुख मार्गांवर वाहतूक निर्बंध घालण्यात आले असून उरण नाका ते टपाल नाका मार्गावर रिक्षा आणि चारचाकी वाहनांना प्रवेशबंदी राहणार आहे. नागरिकांनी प्रशासनाने निश्चित केलेल्या पार्किंगच्या ठिकाणांचाच वापर करावा आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी केले आहे.


संपादकीय

# संवादाचा केंद्रबिंदू

राजधानी नवी दिल्लीत शुक्रवारी पार पडलेल्या ब्रिक्स बिझनेस फोरममध्ये भारताच्या कूटनीतिक सामर्थ्याचे प्रभावी दर्शन घडले. युद्ध, व्यापारातील अडथळे आणि जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारताने संवाद, सहकार्य आणि स्वतःच्या राष्ट्रीय हिताला केंद्रस्थानी ठेवणारी आपली भूमिका पुन्हा स्पष्ट केली.

**अठराव्या ब्रिक्स शिखर परिषदेचा मुख्य कार्यक्रम शनिवारपासून सुरू होत असला, तरी शुक्रवारी झालेल्या ब्रिक्स बिझनेस फोरममधील नेत्यांची भाषणे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वपूर्ण द्विपक्षीय भेटींनी परिषदेच्या मुख्य कार्यक्रमासाठी वातावरणनिश्चिती केली. शुक्रवारचे सर्वाधिक लक्षवेधी दृश्य होते ते पंतप्रधान मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भेटीचे. पश्चिम आशियातील संघर्षांचा सागरी व्यापार आणि भारतीय खलाशांच्या सुरक्षेवर होणारा परिणाम पंतप्रधान मोदी यांनी प्राधान्याने चर्चेत आणला. संघर्षांचा मार्ग संवाद आणि मुत्सद्देगिरीतूनच निघू शकतो आणि शांततेच्या प्रयत्नांना भारत मदत करण्यास तयार आहे, ही भारताची भूमिकाही मोदींनी यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित केली. ऊर्जा, संरक्षण, व्यापार आणि अन्य महत्त्वाच्या क्षेत्रांतील भारत-रशिया सहकार्याला अधिक बळकटी देण्याबरोबरच पश्चिम आशिया आणि काळ्या समुद्रातील संघर्षांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. या भेटीतील एक दृश्य औपचारिक चर्चेपेक्षा अधिक बोलके ठरले. मोदी आणि पुतिन हे दोन्ही नेते एकाच मोटारीतून भारत मंडपम् येथील इनोप्रॉम आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनाला गेले. दोन्ही देशांदरम्यानच्या संबंधांतील परस्पर विश्वास आणि जवळीक यातून स्पष्टपणे प्रकट झाल्याने हे दृश्य जगाचे लक्ष वेधून घेणारे ठरले. प्रदर्शनात कृत्रिम बुद्धिमत्ता, विमान वाहतूक, अवकाश, अणुऊर्जा, अवजड अभियांत्रिकी आणि अन्य क्षेत्रांतील सहकार्याची क्षमता दिसून आली. भारत-रशिया व्यापार २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्टही या व्यापक आर्थिक भागीदारीचे महत्त्व अधोरेखित करते. ब्रिक्स बिझनेस फोरममध्ये मोदींचे भाषणही भारताची आर्थिक दृष्टी स्पष्ट करणारे होते. ब्रिक्स देश जगाच्या सुमारे ५० टक्के लोकसंख्येचे, ४० टक्के जागतिक जीडीपीचे आणि २५ टयांहून अधिक व्यापाराचे प्रतिनिधित्व करतात याकडे मोदींनी लक्ष वेधले. सुरक्षित सागरी मार्ग, अखंड पुरवठा साखळी आणि खलाशांची सुरक्षा ही जागतिक व्यापारासाठी अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ब्रिक्सला नवोन्मेष, उद्योजकता आणि आर्थिक सहकार्याचे प्रभावी व्यासपीठ बनविण्याचा भारताचा प्रयत्नही त्यांच्या भाषणातून दिसला. पुतिन यांनीही रशिया कोणाच्याही विरोधात नसून आपल्या राष्ट्रीय हितांसाठी काम करतो आणि जुन्या-नव्या सर्व भागीदारांसोबत सहकार्य करण्यास तयार आहे असे सांगितले. पायाभूत सुविधा, वित्त आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनीही आर्थिक सहकार्य, सुरक्षित व्यापारमार्ग आणि स्थानिक चलनांमधील व्यापाराला प्रोत्साहन देण्याच्या गरजेवर भर दिला. मोदी-पेझेश्कियान यांची द्विपक्षीय चर्चा या पार्श्वभूमीवर विशेष महत्त्वाची ठरते. तिचे तपशील समोर आल्यानंतर भारताच्या पश्चिम आशिया धोरणाची आणखी एक बाजू स्पष्ट होईल. ब्रिक्सच्या व्यासपीठावर शुक्रवारी भारत केवळ यजमान नव्हता. तो संवादाचा आणि सहकार्याचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू होता. भारताने शुक्रवारी जगाला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे - भारत कोणत्याही एका शक्तिकेंद्राच्या छायेत उभा नाही. तो सर्वांशी संवाद साधतो, राष्ट्रीय हित जपतो आणि बदलत्या जागतिक व्यवस्थेत स्वतःची स्वतंत्र भूमिका ठामपणे मांडतो.**

# वन्यजीव संवर्धन सजीव सृष्टीसाठी आवश्यक



वन्यजीव हे पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीचा आधार आहेत. जेव्हा पृथ्वीवरून वन्यजीवांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट होईल, तेव्हा मानवी जीवनाचा अंत अतिशय वेदनादायक पद्धतीने होणार. वन्यजीवांमुळे जंगले समृद्ध होतात, जंगलांमुळे पाण्याचे स्रोत समृद्ध होतात, झाडे मातीची धूप रोखतात आणि सुपीक जमिनीचे संरक्षण करतात. सर्वांना शुद्ध पाणी आणि शुद्ध ऑक्सिजन मिळते, ऋतूचक्र व्यवस्थित चालते, वेळेवर पुरेसा पाऊस पडतो, हवामान आणि निसर्ग यांच्यात संतुलन राखले जाते, सर्व प्राण्यांची अन्नसाखळी सुरळीत चालते. मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होतो. नैसर्गिक आपत्ती कमी होतात, पिके फुलतात, समाजातील प्रत्येक घटकाला पोषक तत्वांनी समृद्ध असलेले निरोगी अन्न मिळते. आजार कमी होतात, देश स्वावलंबी होतो, नैसर्गिक संसाधने समृद्ध होतात. देशातील दर्जेदार अन्नधान्य आणि उत्पादनांची निर्यात वाढून आयात कमी करण्यास मदत होते. मुबलक प्रमाणात उत्पादनामुळे महागाई कमी होते आणि अशुद्धता, भेसळ आणि घातक रसायनांचा वापर यासारख्या वाईट गोष्टी कमी होतात. मानवाचे राहणीमान सुधारते आणि अशा प्रकारे मानव आणि देश खऱ्या अर्थाने प्रगती करतात. जर आपण बारकाईने निरीक्षण केले तर मानवाचे संपूर्ण जीवन वन्यजीवांवर आधारित असल्याचे दिसून येते. मानव सतत निसर्गाचा नाश करत आहे, परंतु वन्यजीवांमुळेच मानवी जीवनाचे अस्तित्व टिकून आहे, कारण वन्यजीव हे जंगले आणि निसर्गाचे मुख्य रक्षक आहेत. या २०२५ वर्षीच्या जागतिक वन्यजीव दिनाची थीम वन्यजीव संवर्धन वित्त: लोक आणि ग्रहात गुंतवणूक आहे. वन्यजीव संवर्धन प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शाश्वत आर्थिक उपायांची तातडीची गरज यावर ही थीम लक्ष केंद्रित करते; वन्यजीव संवर्धनाला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक यंत्रणांची आवश्यकता आहे.

देशाच्या वाढत्या लोकसंख्येला सुखसोयी पुरविण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधनांवर अमर्याद दबाव आहे. आपण शहरांमधून सुंदर किलबिलाट करणारे पक्षी आधीच हाकलून लावले आहे. शहरे आता महानगरांचे रूप धारण करत आहेत, शहरांभोवतीची गावे, जंगले, शेतजमीन, पाण्याचे स्रोत, नैसर्गिक संसाधने झपाट्याने कमी होत आहेत. शहरे आणि महानगरांमधून वाहणाऱ्या नद्यांनी आता नाल्यांचे रूप धारण केले आहे; विषारी कचरा, ई-कचरा आणि जैव वैद्यकीय कचऱ्याचे प्रचंड डोंगर सतत वाढत आहेत. मानवी जीवनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक उत्पादनाचा कच्चा माल निसर्गाकडून मिळतो, नैसर्गिक संसाधनांच्या अतिरेकी वापरामुळे आपत्ती आणि प्राणघातक आजार सतत वाढत आहेत. लोकसंख्येनुसार शहरांमध्ये नवीन वस्त्या तयार होत आहेत, रस्त्यावर माणसांपेक्षा जास्त वाहने आहेत. पृथ्वीच्या तापमानात सतत बदल होत आहेत, मोठे हिमखंड वितळत आहेत. शहरे आणि गावांमध्ये भूजल पातळी सतत घसरत आहे, याचा थेट परिणाम पिकांवर होत आहे, तापमान वाढत आहे, अन्नधान्याची आयात वाढत आहे. प्रदूषण, गोंगाटा, आर्थिक असमानता आणि गुन्हेगारी वाढत आहे. जंगलातील वन्यजीवांना अन्न आणि पाण्यासाठी मानवी वस्तीत यावे लागते, त्यामुळे मानव आणि वन्यजीवांमधील संघर्ष वाढत आहे. आपण भावी पिढ्यांसाठी असलेल्या संसाधनांचाही वापर केला आहे. आपण निसर्गाकडून जे काही घेतो ते आपल्याला परत द्यावे लागते, पण आजच्या युगात स्वार्थी माणूस निसर्गाला पिळून त्याच्याकडून हिसकावून घेत आहे, माणूस निसर्गाच्या प्रत्येक भागात आपला वाटा निर्माण करत आहे.

वन्यजीव नेहमी मानवी हस्तक्षेपापासून दूर राहण्याचा प्रयंत्न करतात, परंतु मानवच सतत स्वताची व्याप्ती वाढवत आहे, वन्यजीवांना अन्न शोधणे आणि जगण्यासाठी स्पर्धा करणे कठीण बनवत आहे. मानवी चुकांचे परिणाम वन्य प्राण्यांना भोगावे लागतात; वन्यजीवांना त्यांच्या प्राणांचे बलिदान देऊन हवामान बदलाच्या परिणामांची सर्वात मोठी किंमत मोजावी लागते. मानवी प्रगतीमुळे वन्यजीवांचे थेट नुकसान होते, त्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात आणि प्रदूषणामुळे मृत्यू होतात. अनेक वेळा रस्ते अपघात, वीज कोसळणे, उघड्या खड्ड्यात किंवा शेताच्या विहिरीत बुडून वन्य प्राण्यांचा मृत्यू होतो. रस्त्यांचा विकास वाढत असताना, वेगवान वाहनांमुळे वन्य प्राण्यांच्या मृत्यूचा धोका वाढतो. वन्य प्राण्यांसाठी शिकार हा आणखी एक धोका आहे. वन्यजीवांमध्ये मृत्यूची इतर कारणे म्हणजे रोग, दुखापत, परजीवीवाद, उपासमार, कुपोषण, निर्जलीकरण, हवामान परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती आणि इतर प्राण्यांकडून होणारी शिकार. वाढत्या मानवी क्रियाकलापांमुळे तलाव, गवताळ प्रदेश आणि जंगले यांसारख्या अधिवासांचे नुकसान होते, ज्यामुळे वन्यजीवांना सहज वावरणे कठीण होते. परिसंस्थेत सतत बदल होत असतात, ज्यामुळे वन्यजीवांना अन्न, पाणी आणि त्यांच्या पिल्लांना वाढवण्यासाठी चांगल्या नैसर्गिक जागांपासून वंचित ठेवले जाते. प्रदूषणामुळे हवा, माती आणि पाणी दूषित होऊन जंगलांपर्यंत पोहोचते. वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडच्या लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट २०२४ नुसार, गेल्या ५० वर्षांत (१९७०-२०२०) वन्यजीवांच्या लोकसंख्येचा सरासरी आकार विनाशकारीरीत्या ७३ टक्क्यांनी कमी झाला आहे. अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की नैसर्गिक विनाश आणि हवामान बदलामुळे पृथ्वीच्या काही भागांमध्ये धोकादायक पातळीला पोहोचत आहे, ज्यामुळे मानवतेसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे.

गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ४१ वाघ आणि ५५ बिबट्यांची शिकार करण्यात आली. आरटीआय अर्जाद्वारे मिळवलेल्या माहितीनुसार, २०२० ते जानेवारी २०२५ दरम्यान राज्यात १६८ वाघ आणि ८०८ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की बहुतेक मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे आणि अपघातांमुळे झाले आहेत, तरी शिकारीमुळे वाघांच्या मृत्यूची संख्या चिंतेचा विषय आहे. एका शिकारविरोधी तज्ज्ञाचे म्हणणे आहे की स्थानिक शिकारी या हत्यांमध्ये मोठी भूमिका बजावतात आणि ते पुढे म्हणतात की क्रूर टोळ्यांकडून होणाऱ्या संघटित शिकारीच्या ९० टक्क्यांहून अधिक घटनांची नोंदच केली जात नाही. २००२ ते २०२३ पर्यंत, महाराष्ट्राने ८६७ हेक्टर ओलसर प्राथमिक जंगल गमावले, जे १.२८ मेट्रिक टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनाच्या समतुल्य आहे. आदर्शपणे राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र असायला हवे, परंतु सध्या ते फक्त १६.५३ टक्के आहे. इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट २०२३ नुसार, गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रातील वनक्षेत्र सुमारे ५४.५ चौरस किलोमीटरने कमी झाले आहे.

अधिकृतपणे मान्यताप्राप्त स्त्रोतांकडून संकलित केलेल्या जागतिक बँकेच्या विकास निर्देशकांच्या संग्रहानुसार, २०२२ मध्ये भारतातील एकूण वनक्षेत्र ७२६९२८ चौरस किमी नोंदवले गेले. रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट डेटा आणि फील्ड-बेस्ड इन्व्हेंटरीच्या व्याख्येवर आधारित फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाने तयार केलेल्या द्वैवार्षिक अहवालानुसार, २०२३ पर्यंत भारतातील एकूण वन आणि वृक्षाच्छादन ८,२७,३५७ चौरस किमी होते, जे देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २५ टक्के व्यापते. भारताच्या राष्ट्रीय वन धोरणानुसार, पर्यावरणीय स्थिरता राखण्यासाठी जंगलाखालील एकूण भौगोलिक क्षेत्राचा आदर्श टक्केवारी किमान ३३ टक्के असणे आवश्यक आहे. आजच्या आधुनिक सुविधा, साधनसंपन्न समाज आणि सरकार असूनही, बुद्धिमान माणूस अनेक प्रसंगी कमकुवत आणि निराश होतो व आत्महत्या किंवा गुन्हा करतो. मग अशा परिस्थितीत जर वन्यजीवांना अन्न आणि पाण्याची गरज भागवण्यासाठीही संघर्ष करावा लागत असेल, तर त्यांची अवस्था किती वाईट असेल याची कल्पना आपण करू शकतो, अशा परिस्थितीत त्यांनी कुठे जावे, कसे जगावे?

**-डॉ. प्रितम गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन सर्व एकतोय, या मार्गांनी राहा सुरक्षित

तुम्ही जर स्मार्टफोन वापरत असाल तर तुम्हाला कधी कधी वाटत असेल की तुमचा फोन तुमच्या सर्व गोष्टी ऐकतोय. तुम्ही ज्या ज्या गोष्टी बोलता त्याविषयीच्या गोष्टी आपल्याला जाहिराती किंवा सोशल मीडियावर येत असतात. या स्मार्टफोनमुळे आता आपली गोपनीय माहिती सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.



अनेक वेळा आपण स्मार्टफोनमध्ये इन्स्टॉल केलेल्या ॲप्सना कॅमेरा, मायक्रोफोन आणि स्टोरेजचा ॲक्सेस देतो. असे केल्याने, हे ॲप्स आपल्या प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवतात. अशा परिस्थितीत, स्मार्टफोनमध्ये असलेल्या ॲप्सना फक्त आवश्यक परवानग्या देणे महत्वाचे आहे. अनावश्यक ॲप्सना परवानग्या देऊ नका.

तुमची हेरगिरी करण्यासाठी फोन कॅमेरा आणि माइकचा वापर केला जातो. जर तुमच्या फोनचा कॅमेरा किंवा माइक कोणत्याही गरजेशिवाय सक्रिय केला असेल तर तुम्ही तो शोधू शकता. जेव्हा जेव्हा फोनचा कॅमेरा किंवा माइक चालू असतो तेव्हा स्क्रीनवर हिरवा दिवा चमकत असतो.

तुमच्या स्मार्टफोनवर इंस्टॉल केलेल्या ॲप्सच्या परमिशन मॅनेज करण्यासाठी तुम्हाला फोनच्या सेटिंग्ज मेनूमध्ये जावे लागेल. यानंतर, तुम्हाला प्रायव्हसी अंतर्गत परमिशन मॅनेजरमध्ये जाऊन ॲप परवानग्या मॅनेज कराव्या लागतील.

येथे तुम्ही मायक्रोफोन, कॅमेरा आणि लोकेशन यासारख्या ॲपला कोणता ॲक्सेस देण्यात आला आहे ते पाहू शकाल. यात तुम्ही मजबूत गोपनीयता ठेवण्यासाठी, आपण फक्त आवश्यक असलेल्या ॲप्सना परवानगी दिली पाहिजे.

स्मार्टफोन कंपन्या दर महिन्याला किंवा नियमित अंतराने त्यांच्या उपकरणांसाठी सुरक्षा अपडेट्स देत असतात. यासोबतच, फोनमध्ये इंस्टॉल केलेले ॲप्स वेळोवेळी अपडेट करत रहा. तुमचा फोन अपडेटेड ठेवल्याने तुमची सुरक्षा मजबूत होते आणि तुमचा फोन स्पायवेअर आणि मालवेअरपासून सुरक्षित राहतो.

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये गुगल असिस्टंट, सिरी किंवा अलेक्सा सारखे व्हॉइस असिस्टंट वापरत नसाल तर ते बंद ठेवा. व्हॉइस असिस्टंट बंद ठेवण्यासाठी, सेटिंग्जमध्ये व्हॉइस असिस्टंटवर जा आणि ते बंद करा. यामुळे गरज असेल तेव्हाच फोनचा मायक्रोफोन चालू होईल.

# साहित्य संशोधक, ग्रंथकार विनायक भावे

मराठी साहित्यसंशोधक आणि ग्रंथकार तसेच महाराष्ट्र सारस्वत या प्राचीन मराठी साहित्येतिहासग्रंथाचे कर्ते अशी विनायक लक्ष्मण भावे यांची ओळख राहिली आहे. त्यांचा आज स्मृतिदिन.



निमित्त

विनायक भावे यांचा जन्म ६ नोव्हेंबर १८७१ रोजी कुलाबा (विद्यमान रायगड) जिल्ह्यातील पळस्पे या गावी झाला. त्यांचे मराठी व इंग्रजी शिक्षण ठाणे येथे झाले. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधून ते बीएस्सी झाले. ठाणे येथे माध्यमिक शिक्षण घेत असताना काव्येतिहाससंग्रह या मासिकाचे एक संपादक जनार्दन बाळाजी मोडक हे त्यांना मुख्याध्यापक म्हणून लाभले. त्यांचा सहवास व मार्गदर्शन यामुळे भावे यांना मराठी काव्ये वाचण्याची गोडी लागली. शालेय जीवनातच ते मराठी काव्ये आणि कविचरित्रे याविषयी निबंध लिहू लागले होते.

महाराष्ट्र सारस्वताच्या पहिल्या आवृत्तीचे लेखन त्यांनी महाविद्यालयात शिकत असतानाच केले होते. १८९३मध्ये ठाणे येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाची त्यांनी स्थापना केली. १८९८मध्ये त्यांचे वडील मरण पावले. त्यानंतर वडिलांच्या मिठागरात लक्ष घालून त्यांनी मिठाचा व्यापार सुरू केला व त्यात यश मिळविले. १९१८ साली ते त्या व्यापारातून निवृत्त झाले व उर्वरित आयुष्य त्यांनी सर्वस्वी विद्याव्यासंगात घालविले.

महाराष्ट्र सारस्वत हाच भावे यांचा पहिला ग्रंथ होय. त्याची पहिली आवृत्ती विष्णू गोविंद विजापूरकरसंपादित ग्रंथमाला या मासिकात क्रमशः प्रसिद्ध झाली (मार्च १८९८ ते मे १८९९). त्यानंतर या ग्रंथाच्या पाच आवृत्त्या निघाल्या (१९१९, १९२४ १९२८, १९५१, १९६३, १९८२). यापैकी तिसरी आवृत्ती दोन भागांत प्रसिद्ध झाली होती. या ग्रंथाची पहिली आवृत्ती म्हणजे केवळ ९८ पृष्ठांचा एक निबंध होता. तथापि, त्यात भावे यांनी पुढे सतत भर घातल्यामुळे तिसऱ्या आवृत्तीपर्यंत हा ग्रंथ ७४४ पृष्ठांपर्यंत वाढला. चौथा आवृत्ती अद्ययावत करण्याच्या दृष्टीने तिचे संपादक शं.गो. तुळपुळे यांनी सु. २५० पृष्ठांची एक पुरवणी तिला जोडली. पाचव्या आवृत्तीत या पुरवणीत आणखी सु. १०० पृष्ठांची भर पडली. सहाव्या आवृत्तीत या ग्रंथांची विभागणी दोन खंडांत केली आहे : पहिला खंड हा वि. ल. भावलेखित मूळ ग्रंथ असून दुसरा खंड हा शं.गो. तुळपुळे यांनी तयार केलेल्या पुरवणीचा आहे. अशा प्रकारे हा ग्रंथ वाढत गेला.

मराठी साहित्याचा १८१८पर्यंतचा इतिहास महाराष्ट्र सारस्वतात आला आहे. मराठीच्या मूळपीठिकेपासून आरंभ करून पेशवाईअखेरील कवीपर्यंत भावे आलेले आहेत. महानुभव संत आणि त्यांचे साहित्य यांचा परिचय महाराष्ट्र सारस्वतातून करून देऊन साहित्याच्या संशोधनाच्या कामीही भर घातली. प्राचीन मराठी साहित्येतिहासावरील प्रमुख आधारस्तंभ म्हणून आजही ह्या ग्रंथाला मान्यता आहे.

प्राचीन साहित्याच्या संपादनाचेही कार्य त्यांनी केले. अज्ञानदासकृत अफजलखानाचा पोवाडा, श्री जयरामस्वामी (वडगावकर) कृत अपरोक्षानुभव (१९०५), तुकारामबुवांचा अस्सल गाथा (भाग १ व २ १९१९, १९२०), पंडित दामोदरकृत वच्छहरण (१९२४) आणि कवीश्वर भास्करकृत शिशुपालवध (१९२६) ही त्यांची उल्लेखनीय संपादने. ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयात त्यांचा १२ सप्टेंबर हा स्मृतिदिन आजही पाळला जातो. पुणे येथे १२ सप्टेंबर १९२६ रोजी ते निधन पावले.

(साभार मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पाठदुखी दूर करण्यासाठी 'हे' पदार्थ करा बंद!

दिवसभराच्या बैठ्या कामांनी अनेकदा पाठ अवघडते. लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर काम असल्याने बसून काम करण्याशिवाय पर्याय नसतो. एकाच आसनात बराच वेळ बसल्याने पाठदुखी होते.तुम्हाला जर पाठदुखीची समस्या असेल, तर काही पदार्थांपासून तुम्ही दूर राहणे गरजेचे आहे. हे पदार्थ नेमके कोणते ते जाणून घेऊ...



फिटनेस व पोषण शास्त्रज्ञ आणि फूड दरझीचे सह-संस्थापक डॉ. सिद्धांत भार्गव यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. ज्यांना पाठदुखीची समस्या आहे त्यांनी साखर, साखरयुक्त सिरप, मका आणि तेल याचा आहारात समावेश करू नये. नैसर्गिक वा प्रक्रिया न केलेला मका हा आरोग्यदायी असला तरी प्रक्रियेदरम्यान त्यातील पोषक तत्त्वे निघून जातात आणि त्याचा आपल्या शरीरावर वेगळा परिणाम होतो. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या आहारात मक्याचा समावेश करीत असाल, तर तो प्रक्रिया केलेला नसावा. प्रक्रिया केलेला मका खाल्ल्यानं पाठीच्या खालच्या वेदना वाढू शकतात.

डॉ. सिद्धांत भार्गव यांच्या मते, प्रक्रिया केलेल्या मक्यामुळे इन्सुलिनच्या पातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते आणि त्यामुळे जळजळ आणि वजन वाढू शकते. जास्त वजनामुळे मणक्यावर अतिरिक्त ताण पडतो आणि पाठीच्या खालच्या भागात दुखणे वाढते. तसेच यामुळे जळजळ बरे होण्याची प्रक्रिया मंद होऊ शकते आणि पाठीच्या खालच्या भागात दुखण्यासारखी परिस्थिती वाढू शकते.

मक्यामध्ये बी जीवनसत्त्व आणि खनिजे तसेच फायबर असते. मध्यम प्रमाणात सेवन केल्यास एकूण आरोग्यासाठी हे घटक चांगले असू शकतात. संपूर्ण मक्यामध्ये अँटिऑक्सिडंट्सदेखील असतात, जे शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार दाहकविरोधी आहारामुळे पाठदुखी कमी होण्यास मदत होते. भरपूर फळे आणि भाज्या खाणे आवश्यक आहे. कारण त्यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात.

स्वयंपाक करताना हळद किंवा आले घातल्याने शक्तिशाली दाहकविरोधी फायदेदेखील मिळू शकतात तसेच भरपूर पाणी प्यायल्याने आपले शरीर हायड्रेट राहते आणि त्यामुळे स्नायूंमधील कडकपणा कमी होऊन संपूर्ण आरोग्याला चालना मिळते, असे डॉ. भार्गव म्हणाले.

# गणेशभक्तांच्या सेवेसाठी भाजपचा पुढाकार

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते मोफत मिनीबस, मिनीडोअरचा शुभारंभ

**धाटाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी मुंबईहून आपल्या गावाकडे येणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा, यासाठी भाजपा रोहा तालुक्याच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी सुरू करण्यात आलेल्या मोफत मिनीडोअर बससेवेचे कौतुक होत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते अलिबाग येथे गुरुवार दि. (१०) रोजी करण्यात आला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना, जनतेच्या सेवेसाठी राबविण्यात येणारा हा अतिशय चांगला आणि स्तुत्य उपक्रम असल्याचे गौरवोद्गार काढले. विशेषतः भाजपा रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग



यांनी पुढाकार घेऊन गणेशभक्तांसाठी सलग दुसऱ्या वर्षी मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांच्या सेवाभावी भूमिकेचे कौतुक करण्यात आले. तर गणेशोत्सवाच्या काळात मुंबईहून मोठ्या संख्येने चाकरमानी आपल्या गावाकडे येतात. रेल्वेने रोहा येथे आल्यानंतर पुढील प्रवासाची होणारी गैरसोय लक्षात घेऊन अमित घाग यांच्या पुढाकारातून ही सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे वाळी, तांबडी, घोसाळे, विरझोली व भालगाव ग्रामपंचायत परिसरातील मुंबईकर गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष तथा माजी खासदार धैर्यशील पाटील, भाजपाचे नेते सतीश धारप, कृषी सभापती वैकुंठ पाटील, जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक रोशन चाफेकर यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

११, १२ व १३ सप्टेंबर २०२६रोजी गणेशभक्तांसाठी ही मोफत बससेवा उपलब्ध राहणार असून, रोहा प्राईड बायपास रोडजवळ बसचा थांबा ठेवण्यात आला आहे. रेल्वेने रोहा येथे येणाऱ्या भक्तांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे या नोंदणीसाठी अमित घाग ९२२६५५५५५९ व सचिन मोरे ९२७००३५३७८ यांच्याशी संपर्क साधावा. जनतेच्या अडचणीच्या वेळी केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष सेवेत उतरून मदतीचा हात देणारा हा उपक्रम रोहा तालुक्यातील सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरत असून अमित घाग यांच्या या पुढाकाराचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## शिवसेनेच्या दक्षिण रायगड उपजिल्हाप्रमुखपदी महेंद्र मानकर

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवसेना संघटनेच्या रायगड जिल्ह्यातील संघटनात्मक वाटचालीला अधिक बळ देण्यासाठी अनुभवी आणि सक्रिय नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या ॲड. महेंद्र मानकर यांची शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीने माणगाव तालुक्यासह दक्षिण रायगडातील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, संघटनेला तळागाळापर्यंतअधिक मजबूत करण्यासाठी नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त



होत आहे.

रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते ॲड. महेंद्र मानकर यांना उपजिल्हाप्रमुखपदाचे निवडपत्र प्रदान करण्यात आले. पक्षाने त्यांच्यावर सोपविलेली ही नवी जबाबदारी त्यांच्या आजवरच्या संघटनात्मक कार्याची पावती मानली जात आहे.

## माथेरानमध्ये मंदिरातील पुजाऱ्याने हरवलेला मोबाईल पर्यटकाला केला परत

**माथेरान : बातमीदार**

पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये पुन्हा एकदा प्रामाणिकपणाचे दर्शन घडले आहे. कर्नाटकातून माथेरानच्या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या एका पर्यटकाचा मोबाईल फोन अचानक हरवला होता.

मोबाईल फोन सापडत नसल्याने हवालदिल झालेल्या पर्यटकांच्या मदतीसाठी तात्काळ 'व्हॉट्सॲप' ग्रुपवर मोबाईल हरवल्याची पोस्ट टाकण्यात आली.

ही पोस्ट पाहताच स्थानिक रहिवासी अविनाश कोंडीबा गोरे (पुजारी) यांनी अत्यंत प्रामाणिकपणा दाखवत लागलीच संपर्क साधला. "हा मोबाईल मला सापडला असून सुरक्षित आहे,पर्यटकांना माझ्याकडे पाठवून द्या," असा संदेश त्यांनी दिला.त्यानंतर अविनाश गोरे यांनी पर्यटकाची खात्री करून मोबाईल अत्यंत सुरक्षितपणे त्यांच्या स्वाधीन केला. आपला



हरवलेला मोबाईल सुखरूप हातात मिळताच पर्यटकाच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू आणि समाधानाचे हास्य फुलले.त्यांनी अविनाश गोरे यांचे मनःपूर्वक आभार मानले.

अविनाश गोरे यांनी दाखवलेल्या या कौतुकास्पद आणि आदर्श कृत्यामुळे माथेरानच्या आदरातिथ्यात आणि पर्यटकांच्या सुरक्षेच्या विश्वासात आणखी भर पडली आहे.त्यांच्या या प्रामाणिकपणाचे सर्व स्तरातून जोरदार कौतुक होत आहे.

## आज रोह्यात खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते विविध कामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषद करिता वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नमो उद्यान लोकार्पण, रोहा बस स्थानक येथे महिला व बालविकास विभागाअंतर्गत हिरकणी कक्षाचा लोकार्पण, अष्टमी नगरपरिषद हद्दीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळ्याचे भूमिपूजन शनीवारी १२ सप्टेंबर रोजी खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, रवींद्र चाळके नीता हजारे, गौरी बारटक्के, गटनेते महेंद्र गुजर, यासह नगरसेवक, रोहा अषटमीतील प्रतिष्ठित नागरिक, नगरपरिषद कर्मचारी वृंद उपस्थित राहणार आहेत.


**महावितरण** — **ई–निविदा सूचना**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१३८ (२०२४-२५) (३rd call ), टी-१४४ (२०२४-२५) (३rd call ), टी-१७० (२०२४-२५) (३rd call ), आणि टी-६९ (२०२६-२७) (2nd call ) अशा एकुण **चार** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १२.०९.२०२६ पासून ते दि. २१.०९.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २१.०९.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**

**कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप**


## 'सहकारी संस्थेत संचालकाची नीतिमत्ता सर्वांत महत्त्वाची'

**अलिबाग : प्रतिनिधी**

सहकारी संस्थेचा कारभार केवळ आर्थिक व्यवहारांपुरता मर्यादित नसून सभासदांचा विश्वास, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नैतिक मूल्यांवर तो उभा असतो. सहकाराच्या पंचसूत्रीत संचालकाची नीतिमत्ता अत्यंत महत्त्वाची असून संचालक पद हे अधिकाराचे नव्हे, तर सभासदांनी सोपविलेल्या विश्वासाचे पद आहे याचे भान संचालकांनी ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन ॲड. प्रदीप पाटील यांनी केले.

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबागची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच चिंतामणराव केळकर विद्यालय, चेंढरे येथे पार पडली. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. पाटील बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष योगेश रामदास मगर होते. संस्थेचे उपाध्यक्ष संजय ह. पाटील, संचालक मंडळाचे सदस्य, सभासद आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

ॲड. पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सहकार चळवळीचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले की, सहकारी संस्थेची आर्थिक प्रगती महत्त्वाची असली, तरी सभासदांनी संस्थेवर ठेवलेला विश्वास हीच संस्थेची खरी ताकद आहे. हा विश्वास कायम राखण्यासाठी संचालक मंडळाने प्रामाणिकपणा, पारदर्शकता, शिस्त, उत्तरदायित्व आणि सभासदहित या मूल्यांना प्राधान्य दिले पाहिजे.

सभेत संस्थेच्या मागील आर्थिक वर्षातील कामकाजाचा वार्षिक अहवाल, आर्थिक प्रगती, सभासदांच्या हितासाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम तसेच आगामी काळातील संस्थेची वाटचाल याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध विषयांवर सभासदांशी चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.अध्यक्षीय मनोगतात योगेश मगर म्हणाले की, संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासद, संचालक मंडळ आणि कर्मचारी यांचे योगदान महत्त्वाचे आहे.




**सिडको** शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/ करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता. पनवेल, जि. रायगड | | | | |
| १ | तळोजा १०३७ | पेंधर १/२००८ | २३२/२ +३ब<br>**एकुण क्षेत्र** | १–०५–०<br>**१–०५–०** | ९०० चौ.मी. | भुखंड क्र. १५, सेक्टर–८, क्षेत्र–९०० चौ.मी. | **१.कै.सिताराम काळू पाटील (मयत) व कै.कृष्णा सिताराम पाटील (मयत) यांचे वारस–**<br>१.१ शांताबाई कृष्णा पाटील<br>१.२ गजानन कृष्णा पाटील<br>१.३ बाळाराम कृष्णा पाटील<br>१.४ सत्यवान कृष्णा पाटील<br>१.५ सुनिता राजेंन्द्र पाटील<br>१.६ इंदुबाई नारायण भोईर<br>१.७ कुंदा देवदास पाटील<br>**२. कै.मारूती सिताराम पाटील (मयत) यांचे वारस:–**<br>२.१.निराबाई मारूती पाटील २.२.बुधाजी मारूती पाटील<br>२.३.भगवान मारूती पाटील २.३.पांडुरंग मारूती पाटील<br>२.४. रेखा मारूती पाटील उर्फ रेखा अंकूश पाटील<br>**३.तुळसाबाई मनोहर खानावकर (मयत) यांचे वारस**<br>३.१. दिलीप मनोहर खानावकर<br>३.२. किशोर मनोहर खानावकर<br>३.३. विजय मनोहर खानावकर<br>४.यशोदाबाई लक्ष्मण खानावकर<br>५.हिराबाई मंगळराव गोंधळी<br>६.गुणाबाई हरिश्चंद्र पाटील | -- |
| २ | तळोजा ४७२ | पेंधर १७२+६१<br>पेंधर १७२(१)<br>पेंधर १७२<br>पेंधर १७३ | २३५/३B<br>१३८/७ १३८/१७ २४३/१<br>२४२/१B<br>१३६/३<br>एकुण क्षेत्र | ०–१५–५<br>०–१७–०<br>०–२६–७<br>०–७५–६ ०–४२–० (प्रस्तावित)<br>१–०१–२ | ८८८.५ पूर्णांकात ९०० चौ.मी. पैकी २५० चौ.मी | भुखंड क्र. ९८A, सेक्टर–१४, क्षेत्र–२५० चौ.मी. | **श्री. वसंत महादू पाटील** | -- |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :–** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५% टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/२२४/२०२६–२७**



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


डोंगरे सो.
वादीतर्फे वकील
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ

### जाहीर नोटीस

नि. ३९/ड
रे. मु. नं. २०४/२०२३

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर, यांचे कोर्टात,

श्रीमती ताईबाई शांताराम पेटकर, वगैरे................. वादी

विरुध्द

श्री. तुकाराम बबन शेळके, वगैरे...................... प्रतिवादी

प्रति. सौ. सपना रमेश पाटील, रा. मोहो, ता. पनवेल, जि. रायगड

ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादी विरुध्द सदरचा दावा दाखल केलेला आहे. सदर बादी यांना सुनावणीकामी प्रतिवादी नं. २/६ यांनी वरील पत्त्यावर बेलीफामार्फतची समन्सची बजावणी जाणुनबुजुन स्वीकारलेली नाही. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीचे काम प्रलंबित आहे. तरी या नोटीशीद्वारे प्रतिवादी नं. २/६ यांना कळविण्यात येते की, सदर दाव्याची सुनावणीची पुढील तारीख ०८/१०/२०२६ असुन, त्या दिवशी सकाळी १०.३० वाजता तुम्ही स्वतः अथवा नेमलेल्या वकिलांमार्फत हजर राहवे. अन्यथा आपणास सदर दाव्याचे कामी काहीही सांगावयाचे नाही, असे समजुन दाव्याची सुनावणी प्रतिवादी नं. २/६ याचे विरुध्द एकतर्फी घेवून योग्य तो निर्णय दिला जाईल

आज दिनांक : १०/९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर पनवेल.**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे शिवकर, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री संदिप जनार्दन घोगरे व श्री वैभव संदिप घोगरे, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः–

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे शिवकर,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | |
| ७५/२/२ | ०.१७.९० | ०.०२.१० | ०.२०.०० | ४.०६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **०७** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/०९/२०२६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्कः– ८८८८२७१७५९

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांची विद्यमान मालक परशुराम काळ्या कोळी, मंजुलाबाई कृष्णा कोळी, विठ्ठल काळ्या कोळी गंगुबाई रामदास पाटील यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल टीना भरत गोसर व ईतर यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक परशुराम काळ्या कोळी, मंजुलाबाई कृष्णा कोळी, विठ्ठल काळ्या कोळी, गंगुबाई रामदास पाटील यांनी आमच्या अशिलांना लेखीपत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे. तसेच विक्री परवानगी आणि रहिवासी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये बदल करण्यासाठीचा अर्ज केला जाईल आणि त्यानंतर विक्री प्रक्रिया सुरू होईल.

मिळकतीचे वर्णन–: **मौजे–टाकीगाव (५५३३२५) (ULPIN : 23742435220), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५/१ खाते क्रमांक :९९ | २ | ०.६८.५०<br>पो.ख. ०.१०.०० | ८.६२ |
| | | एकूण क्षेत्र– **०.७८.५०** | |

या एकूण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.४४.०० गुंठे हे विक्रीस असलेले क्षेत्राची पेपर नोटिस

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत साठे करार मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क, वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून **२१** दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून **२१** दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक – ११/०९/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**


बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०६
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा!

## विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

गणरायाचे आगमन सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, अशा शुभेच्छा देत गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक सलोखा राखून पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा. गणेशभक्तांनी प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी केले आहे.



महाराष्ट्राला शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात सण-उत्सव साजरे करण्याची समृद्ध परंपरा आहे. ही परंपरा यंदाही कायम ठेवत नागरिकांनी उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. गणेश मंडप, विसर्जन स्थळे, बाजारपेठा, रेल्वे स्थानके, बसस्थानके तसेच अन्य गर्दीच्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करू नये. गर्दीच्या ठिकाणी संयम राखून प्रशासन व पोलिसांना सहकार्य करावे. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक प्रवास करीत असल्याने वाहतूक कोंडी होणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. गणेशभक्तांनी प्रवासाचे योग्य नियोजन करून वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. वाहन चालविताना निर्धारित वेगमर्यादा पाळावी, मोबाईलचा वापर टाळावा तसेच गर्दीच्या ठिकाणी संयम बाळगावा. वाहतूक पोलीस आणि प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असेही अग्रवाल यांनी सांगितले.

गणेशभक्तांच्या सुरक्षित व सुरळीत प्रवासासाठी प्रशासनाने आवश्यक अतिरिक्त मनुष्यबळ व पोलीस फौजफाटा तैनात केला आहे. पोलीस, महसूल, परिवहन, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संबंधित विभाग समन्वयाने काम करीत आहेत. नागरिकांनी या सर्व यंत्रणांना सहकार्य करून उत्सव काळात कोणतीही अनुचित परिस्थिती निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी.गणेशमूर्ती व सजावटीमध्ये पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा. प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच ध्वनिप्रदूषण होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करावे. गणेशमूर्ती विसर्जनासाठी प्रशासनाने निश्चित केलेले कृत्रिम तलाव, विसर्जन कुंड किंवा अन्य अधिकृत विसर्जनस्थळांचाच वापर करावा.

नदी, तलाव, समुद्र अथवा अन्य नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण होणार नाही, याची प्रत्येकाने जबाबदारी घ्यावी.उत्सवाच्या काळात सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याबरोबरच निर्माल्य संकलनासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या व्यवस्थेचा नागरिकांनी वापर करावा. गणेशोत्सवातून भक्ती आणि श्रद्धेबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात रुजविण्याची संधी मिळते. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून स्वच्छ व प्रदूषणमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे विभागीय आयुक्तांनी सांगितले.

कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी शासनाने पथकरातून (टोल) सवलत दिली आहे. गणेशभक्तांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. तसेच उत्सवाच्या काळात महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि दिव्यांग नागरिकांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास नागरिकांनी घाबरून न जाता पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य विभाग आणि स्थानिक प्रशासनाशी तातडीने संपर्क साधावा. सार्वजनिक ठिकाणी संशयास्पद अथवा आपत्कालीन परिस्थिती आढळल्यास संबंधित यंत्रणेला त्वरित माहिती द्यावी. प्रशासनाच्या सर्व यंत्रणा नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सज्ज असून, नागरिकांच्या सहकार्यामुळे गणेशोत्सव अधिक सुरक्षित आणि सुरळीतपणे पार पाडण्यास मदत होईल, असा विश्वास विभागीय आयुक्तांनी व्यक्त केला.

# द्रोणागिरीत सिडकोची कारवाई

## २५,५०० चौमी जागा अतिक्रमणमुक्त

**नवी मुंबई : बातमीदार**

द्रोणागिरी नोडमधील सेक्टर ७, भेंडखळ गाव परिसरात सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विभागामार्फत मोठी निष्कासन मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत अनधिकृतरीत्या उभारण्यात आलेली दोन गोडाऊन, एक गॅरेज आणि तीन वजन काटे जेसीबी व पोकलेनच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आले.



या कारवाईमुळे अंदाजे २५,५०० चौमी जागा अतिक्रमणमुक्त करण्यात आली. सिडकोच्या संपादित व अधिसूचित जागेवर कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तसेच सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करून सदर अनधिकृत बांधकामे उभारण्यात आली होती. त्यामुळे सिडको प्रशासनाने संबंधित बांधकामांवर निष्कासनाची कारवाई केली. ही मोहीम मुख्य दक्षता अधिकारी यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी अमित राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान स्थानिक पोलिसांचे दोन अधिकारी व आठ कर्मचारी, सिडको पोलीस पथकातील एक अधिकारी व आठ कर्मचारी, महावितरण विभागाचा एक कर्मचारी, सिडकोचे १२ सुरक्षारक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे चार सुरक्षारक्षक सहभागी झाले होते.

निष्कासन मोहिमेसाठी आठ मजूर, एक पोकलेन, एक जेसीबी, एक टेम्पो आणि दोन जीपचा वापर करण्यात आला. सिडकोच्या जागेवर अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांविरोधात यापुढेही अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# सिडको अग्निशमन दलातील पाच जवानांचा सन्मान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर पांडवकडा धबधब्यात बुडत असलेल्या एका तरुणाचा काढताना उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल सिडको अग्निशमन दलातील पाच जवानांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अग्निशमन दलाच्या यशस्वी कामगिरीबद्दल नवी मुंबई परिसरातून जवानांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



सुरेश मेंगडे, पोलीस उपमहानिरीक्षक तथा मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. प्रशांत कुंडलिक दरेकर अग्निशमन प्रणेता, कौस्तुभ रमेश वायदंडे फायरमन, सूरज पाटील फायरमन, प्रीतम पाटील फायरमन, चेतन पवार फायरमन यांना सन्मानित करण्यात आले.

दरम्यान, यावेळी जवानांनी अग्निशमन आणि आणीबाणी सेवेत केलेल्या कार्याची स्तुती करून त्यांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यास मुख्य अग्निशमन अधिकारी विजय शांताराम राणे आणि अग्निशमन केंद्र अधिकारी सौरभ श्रीराम पाटील हे उपस्थित होते. त्यांनी जवानांचे मनोबल वाढवत त्यांचा गौरव केला.

# सानपाड्यात बस शेल्टर उभारणीच्या कामाला सुरुवात

## परिवहन समिती सदस्य राजेश राय यांच्या पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

परिवहन समिती सदस्य राजेश राय यांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे सानपाडा विभागातील जनतेच्या सोयीसाठी पाच बस शेल्टर उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. राजेश राय यांची नवी मुंबई महानगरपालिका परिवहन समिती सदस्यपदी निवड करण्यात आली. राय यांना सदस्यपद मिळाल्यानंतर सभागृहनेते सागर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच परिवहन समिती सभापती विकास झंजाड यांच्या सहकार्याने परिवहन विभागाशी संबंधित असलेल्या प्रवाशांच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या, तसेच काही सूचना देखील परिवहन विभागाकडे मांडल्या.



राजेश राय यांनी सानपाडा येथे परिवहन अधिकाऱ्यांना घेऊन विविध ठिकाणच्या बस थांब्यांची पाहणी केली. यावेळी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून सानपाडा विभागातील प्रवासी जनतेच्या सोयीसाठी स्वामी विवेकानंद स्कूल येथे दोन बस शेल्टर, नत्थू जोमा चौक येथे दोन बस शेल्टर आणि अनिरुद्ध भवन या ठिकाणी एक बस शेल्टर असे एकूण पाच बस शेल्टर बसविण्यात याव्यात, अशा सूचना केल्या होत्या. राजेश राय यांनी केलेल्या सूचनेनुसार परिवहन विभागाकडून कामाची सुरुवात करण्यात आल्याचे पत्र कार्यकारी अभियंता विवेक अचलकर यांनी राजेश राय यांना पाठविले आहे.

यामध्ये अचलकर यांनी सांगितले आहे की, नत्थू जोमा चौक या ठिकाणी नवीन एक बस शेल्टरची उभारणी करण्यात आली असून उर्वरित ठिकाणी बस शेल्टर उभारणीची पूर्वतयारी करण्यात आली आहे. राय यांनी केलेल्या सूचनेनुसार परिवहन विभागामार्फत काम केल्याबद्दल परिवहन व्यवस्थापक उमाकांत जंगले आणि परिवहन विभाग प्रशासनाचे त्यांनी आभार मानले आहेत.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उरणमध्ये पोलिसांची समन्वय बैठक

**उरण : वार्ताहर**

गणेशोत्सव शांततेत व उत्साहात साजरा व्हावा यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, सहपोलीस आयुक्त पोर्ट विभाग यांच्या वतीने उरण येथे अधिकारी, पदाधिकारी व शांतता समितीची संयुक्त समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठक १० सप्टेंबरला बहुउद्देशीय सभागृह, जेएनपीटी वसाहत येथे पार पडली.




बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहपोलीस आयुक्त नवी मुंबई दीपक साकोरे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ बेलापूर अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग विजय चौगुले उपस्थित होते. यावेळी उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज पाटील, मोरा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल काटवानी, उलवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन रजाने, उरण वाहतूक प्रभारी संजय पाटील, न्हावा-शेवा वाहतूक प्रभारी अतुल दहिफळे, गटविकास अधिकारी उरण सर्जेराव पाटील, उरण नगर परिषदेचे प्रशासक राजेश घाडगे, नगराध्यक्षा भावना घाणेकर, सिडको अग्निशमन विभागाचे अमित कांबळे, नायब तहसीलदार महेश पाटील, जिल्हा परिषद सदस्य मनीष पाटील, महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल भंडारे यांच्यासह पोलीस पाटील, शांतता समितीचे सदस्य, महिला सदस्य, नगरसेवक, गणेश मंडळांचे अध्यक्ष, समाजसेवक, नागरिक आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलिसांनी मंडळांना सूचना दिल्या की, उरण परिसरात सात सार्वजनिक आणि नऊ सोसायटीचे गणपती आहेत. गणेश मंडळांनी मंडप उभारताना ७५ टक्क्यांपेक्षा जास्त रस्ता अडवू नये. गणपतीच्या मूर्तीची उंची जास्त ठेवू नये. आवाजाची मर्यादा ओलांडल्यास पाच लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. रात्री मंडळाच्या ठिकाणी स्वयंसेवक नेमावेत आणि प्रत्येक मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे आणि अग्निशमन यंत्र बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## सॅकमधील एक लाख रुपयांची चोरी

**नवीन पनवेल :** सीटवर ठेवलेल्या सॅकमधील एक लाख रुपयांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात ९ सप्टेंबर रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ९ सप्टेंबर रोजी रात्री बारा ते सव्वा एकच्या दरम्यान वैष्णवी हॉटेल खारपाडा टोलनाका या ठिकाणी जेवणासाठी ट्रॅव्हल्स थांबली होती. यावेळी अक्षय जाधव यांनी अश्विनी ट्रॅव्हल्स या बसच्या सीटवर ठेवलेल्या सॅकमधील एक लाख रुपये कोणीतरी चोरून नेले.

## 'बिंगो'वर कारवाई, तिघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** बिंगो या ऑनलाइन जुगारावर कारवाई करत गुन्हे शाखा कक्ष तीनच्या पोलिसांनी तळोजा पोलीस ठाण्यात ९ सप्टेंबर रोजी तिघा विरोधात गुन्हा दाखल केला.९ सप्टेंबर रोजी सहाच्या सुमारास देवराज कॅफे तोंडरा फाटा या ठिकाणी सुमित कुमार रामभाऊ ठाकूर (मॅनेजर राहणार पाले खुर्द) याने देवराज कॅफेचा मालक रुपेश राघो पाटील (राहणार तोंडरेगाव) यांच्या सांगण्याप्रमाणे संगणकावर बिंगो या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गेम मधील रोलेट हा जुगार खेळवत असताना गिऱ्हाईक चैतन्यकुमार दास हे सापडून आले.

# उरणच्या चिरनेरमध्ये गणेशमूर्तींची परंपरा यंदाही कायम

## शासनाने जागा आणि बँकांनी अर्थसहाय्य करण्याची कारागिरांची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

अनेक विघ्नांवर मात करीत उरण तालुक्यातील चिरनेर कलानगर गणपती कारखानदारांनी चिकाटीने व्यवसाय करीत यावर्षीदेखील विघ्नहर्ताच्या सुमारे शेकडोहून अधिक मूर्ती तयार करून त्या विक्रीसाठी इतरत्र पाठविल्या आहेत. मूर्ती कलेचे गाव म्हणून चिरनेर कलानगरची ओळख आहे.

गेल्या आठ दहा पिढ्यांपासून येथील मूर्तिकार आपली मूर्ती बनवण्याची कला अनेक अडचणी आणि समस्यांना सामोरे जात आपली कला जपत आले आहेत. चिरनेर गावात प्रामुख्याने, कलानगरामध्ये कुंभार समाजाची एकत्रित अशी वस्ती आहे.प्रत्येक कुटुंबात घरातच मूर्ती तयार करण्याचे कारखाने आहेत. गणरायाच्या मूर्तीबरोबर मातीपासून विविध प्रकारची कलात्मक भांडी तयार करून आपल्या कलेचा व्यवसाय हे कलाकार चालवित असले, तरी येथील गणेशमूर्ती घडविणारे मूर्तिकार संकटाच्या सावटाखाली वावरत आहेत.

मातीकामातून मूर्तिकला साकारणे या समाजाला मिळालेली दैवी देणगी आहे. कुंभारचे स्थान समाजासाठी महत्त्वाचे आहे. परंतु निराकारातून आकार देणाऱ्या कुंभाराकडे कोणी फारसे लक्ष देताना दिसत नाही. या कुंभार समाजाला कलेच्या बाबतीत अनेक समस्यातून जावे लागत आहे. येथील कुंभार समाज आर्थिक शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला आहे. या समाजातील बहुसंख्य लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत आहेत. तर या समाजास त्यांचे इतर मिळणारे लाभ मिळत नाहीत. निर्जीव मातीत आपल्या कलेने जीव उतरणारा कुंभार समाज हा मूर्तीकलेचे काम करणारा समाज आहे. परंतु भांडवला अभावी येथील कुंभार समाजाला हा व्यवसाय करण्यासाठी मोठी आर्थिक अडचण येत आहे. रंग, माती, आणि इतर साहित्य यांच्या वाढत्या दरामुळे हा व्यवसाय भांडवली स्वरूपाचा झाला आहे.स्वातंत्र्य पूर्व काळापासून या मूर्ती कलेचा वारसा चिरनेर कला नगरीला लाभला असून स्व. शांताराम चौलकर, स्व. गणू चिरनेरकर, स्व. पोसू चौलकर, स्व. दगडू चौलकर स्व. दत्तात्रेय चिरनेरकर, स्व. जगन्नाथ हातनोलकर तसेच येथील अनेक नामवंत मूर्तिकारांनी या कलेचे आणि चिरनेर कलानगरीचे नाव उज्वल करण्यात मोठे योगदान दिलेले आहे.



या कलेचा पिढीजात वारसा पुढील पिढ्यांनी देखील तेवढ्याच समर्थपणे पुढे नेऊन, चिरनेर कलानगरीच्या नाव लौकिकात मोलाची भर टाकण्याचे काम अव्याहतपणे सुरू ठेवलेले आहे. अनेक मूर्तिकारांच्या पाचव्या सहाव्या पिढ्या या व्यवसायात कार्यरत आहेत. उत्कृष्ट रंगसंगती, भावमुद्रा, सजीवपणा दर्शविणारी आखणी अशी चिरनेर कलानगर येथील गणेशमूर्तींची खासियत आहे.परंतु बाहेरील गणेशमूर्तींच्या आक्रमणामुळे येथील गणेशमूर्तींच्या मागणीत आत्ता मोठ्या प्रमाणावर घट झाली असल्याचे येथील मूर्तिकारांनी सांगितले. मातीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती व कलात्मक भांडी तयार करून विकणे, हा कुंभार समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. परंतु शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यापासून हा समाज वंचित आहे. निर्जीव मातीत आपल्या कलेने जीव ओतून गणेशमूर्तींचे उत्पादन करणारा हा समाज आहे. या व्यवसायाला लागणारी माती, रंग, जागा आणि आर्थिक पाठबळ या बाबींमुळे हा व्यवसाय भांडवली स्वरूपाचा झाला.

चिरनेरसारख्या ग्रामीण भागातील मूर्तिकारांना शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी तसेच बँकांनी अर्थसहाय्य करावे, तरच येथील मूर्तीकला अस्तित्वात राहील. चिरनेरला लाभलेला कलेचा वारसा पुढे नेण्याचे काम मूर्तिकार गजानन चौलकर, नंदकुमार चिरनेरकर, दामोदर चौलकर, भाई चौलकर, प्रसाद चौलकर ,संदेश चौलकर, अभिजीत चिरनेरकर, सुनील चौलकर, रंगनाथ चौलकर, चेतन चौलकर,अमित चिरनेरकर, दीपक म्हशीलकर कुणाल चिरनेरकर, प्रकाश चिरनेरकर, जीवन चौलकर, रंगनाथ चौलकर, भालचंद्र हातनोलकर, नारायण चिरनेरकर, नरेश हातनोलकर, विजय चौलकर, रघुनाथ हातनोलकर, विलास हातनोलकर, विष्णू चौलकर, रामा चौलकर, नारायण चौलकर हे करीत आहेत.

# विद्याभवनमध्ये अथर्वशीर्ष पठण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात गणेशोत्सवाच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी गणपती अथर्वशीर्षाची अकरा आवर्तने करून मनोभावे गणेशाचे पूजन केले. येथील विद्याभवन संकुलातील मराठी माध्यमातील सर्व विद्यार्थी संस्कृतमधील अथर्वशीर्षाचे पठण करतात.

दरवर्षी गणेशोत्सवाच्या सुट्टीवर जाण्याअगोदर सर्व विद्यार्थी आणि शिक्षक अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण करतात. विविध सण-उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृती तसेच सामाजिक बांधिलकी आणि एकात्मता जपण्यास व रुजविण्यास हातभार लागतो. या कार्यक्रमाची तयारी विद्यार्थ्यांनीच केली होती. अथर्वशीर्षाचे पठण झाल्यावर विद्यार्थ्यांनी मनोभावे पूजा केली व आरती गायली. मुख्याध्यापक गोरख कदम यांनी सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास ज्येष्ठ शिक्षिका राजकुमारी इंदलकर, जयश्री तिपायले, दत्तात्रय आटपाडकर, जयवंत अगिवले व आदर्श शिक्षक अविनाश कुलकर्णी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# महाडमधील हुतात्मा स्मारकाच्या सुशोभिकरणासाठी ५० लाखांचा निधी

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात–अज्ञात वीरांनी केलेल्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्यासह स्वातंत्र्यवीर, हुतात्मे आणि सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या बलिदानाचे स्मरण करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन रायगडचे पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री भरतशेठ गोगावले म्हणाले की, महाडच्या हुतात्मा स्मारकाच्या सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून, जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेऊन निधी उपलब्ध करून देण्यात येईल. १० सप्टेंबर १९४२ रोजी क्रांतिसिंह नानासाहेब पुरोहित यांच्या नेतृत्वाखाली महाड तहसील कार्यालयावर निघालेल्या किसान मोर्चावर पिंपळपार परिसरात तत्कालीन इंग्रज सरकारच्या पोलिसांनी अंदाधुंद गोळीबार केला.

या गोळीबारात कमलाकर दांडेकर, अर्जुन भोई, वसंत दाते, नथु टेकावला आणि विठ्ठल बिरवाडकर या पंचवीरांना वीरमरण आले.



या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ आयोजित ८४व्या हुतात्मा दिनानिमित्त पालकमंत्री गोगावले यांनी हुतात्म्यांना अभिवादन केले. स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी समितीने केलेल्या मागणीची दखल घेत पालकमंत्री गोगावले यांनी महाडच्या हुतात्मा स्मारकाला हुतात्मा कमलाकर दांडेकर यांचे नाव देण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यासाठी महाड नगरपरिषदेच्या आगामी सभेत ठराव मंजूर करण्याची सूचना त्यांनी केली. या निर्णयाला कोणाचीही आडकाठी येणार नसून स्मारकाला कमलाकर दांडेकर यांचे नाव दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच स्मारकाच्या परिसराचे व्यापक सुशोभीकरण करण्यासाठी ५० लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. बिरवाडी येथील गार्डनमध्ये प्रस्तावित असलेल्या हुतात्मा विठ्ठल बिरवाडकर यांच्या स्मारकासाठी, तसेच महाड तालुक्यातील इतर हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्ती व संवर्धनासाठीही आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे गोगावले यांनी सांगितले. महाडच्या हुतात्मा दिनाचा इतिहास शालेय पाठ्यपुस्तकात समाविष्ट करावा, ही मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. या मागणीचीही पालकमंत्र्यांनी दखल घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास नव्याने पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्याबरोबरच तो सीबीएसई अभ्यासक्रमातही घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर महाडच्या हुतात्मा दिनाचा इतिहास पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्याबाबत लवकरच कॅबिनेट बैठकीत विषय मांडून निर्णय घेण्यात येईल, असा शब्द गोगावले यांनी महाडकरांना दिला. स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी समिती, रायगड जिल्हा परिषद आणि महाड नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी हुतात्मा दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाड नगर परिषद शाळा क्रमांक ४ येथून हुतात्म्यांच्या प्रतिमांना अभिवादन करून भव्य रॅली काढण्यात आली. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी महाड शहर दुमदुमून गेले. बाजारपेठेतून छत्रपती शिवाजी महाराज चौकातील हुतात्मा स्मारकापर्यंत निघालेल्या या रॅलीदरम्यान शहरातील विविध चौकांमध्ये असलेल्या हुतात्म्यांच्या नामफलकांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचे उपकार कधीही विसरता कामा नयेत, असे सांगितले. महाडच्या क्रांतीचा इतिहास भावी पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी तो पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्याची तसेच हुतात्मा स्मारकाचे सुशोभीकरण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. महाडच्या हुतात्मा स्मारकाला कमलाकर दांडेकर यांचे नाव देण्याचा ठराव पालिकेत सर्वानुमते मंजूर होईल आणि पुढील वर्षीचा हुतात्मा दिनाचा कार्यक्रम हुतात्मा कमलाकर दांडेकर स्मारकात होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी समितीच्या वतीने श्रीकृष्ण बाळ यांनी प्रास्ताविक करताना हुतात्मा स्मारकाला कमलाकर दांडेकर यांचे नाव देणे, स्मारक परिसरातील मुख्याधिकारी निवासस्थान पाडून त्या जागी भव्य हुतात्मा स्मारक उभारणे आणि महाड हुतात्मा दिनाचा इतिहास पाठ्यपुस्तकात समाविष्ट करणे, या प्रमुख मागण्या मांडल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर शेठ यांनी केले तर आभार नितीन पावले यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भुस्कुटे, माई पोतदार, पंचायत समिती सभापती प्रेरणा सावंत, उपसभापती सुरेश महाडीक, उपनगराध्यक्ष संदीप जाधव, तहसीलदार महेश शितोळे, डीवायएसपी प्रदीप काळे, पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे, गटविकास अधिकारी साळुंखे, तसेच नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, अधिकारी–कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

## श्रीवर्धनमध्ये स्वच्छ भारत अभियानाचा शासकीय कार्यालयातच बोजवारा

**श्रीवर्धन : बातमीदार**



विद्यमान रायगडचे खासदार सुनील तटकरे हे महाराष्ट्राचे तात्कालीन अर्थमंत्री असताना श्रीवर्धन येथील सर्व शासकीय कार्यालये एकाच इमारतीत असावी या उद्देशाने श्रीवर्धन शहरामध्ये मध्यवर्ती प्रशासकीय भवनाचे बांधकाम करण्यात आले. या इमारतीमध्ये तळमजल्यावरती श्रीवर्धन तहसील कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, कृषी विभाग, त्याचप्रमाणे तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय आहे. तर पहिल्या मजल्यावरती उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचे कार्यालय असून त्याच्या बाजूलाच सभागृह आहे. मात्र या इमारतीतील सर्व परिसराचा आढावा घेतला असता. असे लक्षात आले की, या ठिकाणाची नियमित स्वच्छता होत नाही. या ठिकाणचा कचरा काढला जात नाही. किंवा फरशी देखील पुसली जात नाही.

इमारतीच्या पॅसेजमध्ये अनेक ठिकाणी पाणी पिण्याच्या रिकाम्या बाटल्या, चहाचे रिकामे कागदी कप, त्याचप्रमाणे इतर कचरा देखील पडलेला पाहायला मिळाला. या ठिकाणी कर्मचाऱ्यांना खेळण्यासाठी देखील एक व्हॉलीबॉल किंवा बॅडमिंटन कार्पेटलॉन तयार करण्यात आलेले आहे. या ठिकाणी देखील कचरा असलेला पाहायला मिळाला. वास्तविक पाहता एवढी मोठी इमारत असल्यामुळे या ठिकाणी कमीत कमी दोन स्वच्छक असणे आवश्यक आहे. श्रीवर्धन तालुक्यातील व श्रीवर्धन उपविभागातील अनेक नागरिक आपल्या विविध कामांसाठी या कार्यालयामध्ये वारंवार येत असतात. त्यामुळे या ठिकाणची स्वच्छता राखणे ही देखील त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांची प्रथम जबाबदारी आहे. या ठिकाणी असलेली स्वच्छता गृहे देखील पाहिली असता, त्या ठिकाणची स्वच्छता देखील यथातथाच असल्याचे पाहायला मिळाले.

संपूर्ण देशामध्ये स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छतेची विविध कामे चालू असतात. अनेक ठिकाणी रस्ते, रस्त्याच्या बाजूला असलेली गटारे, त्याचप्रमाणे विविध आस्थापने या ठिकाणी स्वच्छतेची कामे नेहमीच चालू असल्याचे दिसून येते. परंतु श्रीवर्धन येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवनामध्ये केव्हाही एखादा स्वच्छक झाडू घेऊन झाडू मारताना आढळून येत नाही. किंवा एखादा स्वच्छक फरशी पुसताना आढळून येत नाही. या ठिकाणच्या फ्लोरिंगला कोटा मार्बल बसविण्यात आला आहे. तर साईडच्या भिंतींना जवळजवळ सहा फुटापर्यंत टाइल्स बसवण्यात आल्या आहेत. या सर्व परिसराची स्वच्छता नियमितपणे राखणे आवश्यक आहे. मात्र असे होताना दिसत नाही. याची जबाबदारी कोणाकडे? असा प्रश्न उपस्थित होतो. तरी या इमारतीत असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांनी इमारतीची स्वच्छता रोज कशा प्रकारे केली जाईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

फक्त कोणी वरिष्ठ अधिकारी किंवा मंत्री या ठिकाणी येणार असतील तरच या परिसरातील साफसफाई करण्यात येते. अन्यथा नियमितपणे या ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य असल्याचे दिसून येते. तळमजल्यावरून उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या जिन्याच्या पायऱ्या देखील अनेक वेळा अस्वच्छ असतात. तरी सदर इमारतीची नियमित साफसफाई करण्यासाठी या ठिकाणी स्वच्छकांची नेमणूक करण्यात यावी. जेणेकरून त्या ठिकाणी आपल्या विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना मध्यवर्ती प्रशासकीय भवनाच्या इमारतीत फिरताना प्रसन्न वाटेल. इमारतीच्या स्वच्छतेसाठी निधीची तरतूद नसेल, तर त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून निधीची तरतूद करून घ्यावी. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## यशवंतनगर विद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका विधी सेवा समिती, तालुका वकील संघ, व श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, यशवंतनगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात गुरुवारी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मुरुड तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर घनश्याम तिवारी होते.




या शिबिरामध्ये नागरिक, विद्यार्थी व समाजामध्ये कायदेविषयक जागृती निर्माण करण्यासाठी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. न्यायालयाबाहेर वाद मिटविण्याच्या पद्धती व त्यांचे फायदे तसेच नागरिकांची मूलभूत कर्तव्ये, अमली पदार्थांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती व नशा मुक्त भारत अभियान ,पोक्सो कायद्याचे शाळा व महाविद्यालयां मध्ये असलेले महत्त्व आणि बालकांच्या संरक्षणाबाबत माहिती.शेवटच्या घटकांपर्यंत न्याय अर्थात घर घर में न्याय की जागरूकता या उपक्रमांतर्गत कायदेविषयक सविस्तर माहिती अ‍ॅड. एन.डी.पाटील , अ‍ॅड. विनायक शेडगे, अ‍ॅड .फैसल लियाकत जामदार यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका अर्चना खोत मॅडम यांनी केले.यावेळी शाळेचे पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी राहील घलटे, सहा. शिक्षक सागर राऊत आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश रामदास पाटील यांनी तर आभार प्रदर्शन सुरज झावरे यांनी केले.

शिबिराला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणपती आरास स्पर्धा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील श्री शिवप्रेमी शिवभक्त मित्र मंडळ मजगाव नांदगाव पंचक्रोशीतर्फे घरगुती गणपती बाप्पा आरास सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

समस्त कोकणवासीयांचे आराध्य दैवत म्हणजे गणपती बाप्पासाठी पर्यावरणपूरक आरास सजावट करणाऱ्यांसाठी ही स्पर्धा असून प्रवेश विनामूल्य आहे. यासाठी सामाजिक विषयावर जाणीव जागृती संबंधित असणे गरजेचे असून पर्यावरणपूरक आरास सजावटीस विशेष प्राधान्य दिले जाईल. आपला बाप्पा किती दिवसांचा आहे ते नमूद करावे. एक ते तीन क्रमांक व दोन उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत. नोंदणीसाठी १३ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. नोंदणीकरिता आशिष बुल्लु (८२३७२७५६६८), समीर माळी (८२३७७०२५९५), नाथा गिरणेकर (९२२५४८७८४४), योगेश घरत (९०४९६९९२५००), शनिकेत भोईर (८९८३०९२०४८), सिद्धेश बेडेकर (७२६४०२३५२०), नितेश कांबळे (८१४९२४५३५८) यांच्याशी संपर्क साधावा.

## पेणमध्ये गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सत्कार

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी या पतसंस्थेची ३९वी वार्षिक सर्वसाधारण सभा प्रायव्हेट हायस्कूल येथे पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष धनाजी घरत होते. यावेळी गुणवंत विद्यार्थी, शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

या सर्वसाधारण सभेस पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड मंगेश नेने, प्रायव्हेट हायस्कूलचे उपप्राचार्य पोपटराव भांडवलकर, मुख्याध्यापिका विद्या घरत, मुख्याध्यापक व संचालक संतोष जाधव उपाध्यक्ष गौरव चऱ्हाटे, सेक्रेटरी सुनील खेडकर संचालक भास्कर देशमुख, सतीशकुमार पवार, शिवसजन कान्हेकर, संचालिका, अर्चना नेमाडे, सुजाता जाधव, तज्ज्ञ मार्गदर्शक मधुकर साळुंके आदी उपस्थित होते.



यावेळी ९७व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सहकार कायद्यात करण्यात आलेल्या नवीन तरतुदीनुसार सभासद प्रशिक्षण आवश्यक करण्यात आले असल्याने संस्थेच्या सभासदांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी सहकार खात्याचे राजेंद्र ढवळे यांनी संस्थेच्या भाग भांडवल सभासद उपस्थिती नफ्याचे प्रमाण ठेवी व कर्ज याविषयी सविस्तर माहिती दिली. प्रशिक्षणानंतर शैक्षणिक वर्षातील गुणवंत विद्यार्थी यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, रोख रक्कम देऊन, तर शिक्षकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कवी लेखक डॉ देविदास बामणे, उत्कृष्ट निवेदिका सुजाता जाधव, आदर्श शिक्षक धनाजी घरत, आदर्श शिक्षिका अर्चना नेमाडे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल पतसंस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. पेण एज्युकेशन सोसायटी या संस्थेला आदर्श राज्य शिक्षण संस्था पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड मंगेश नेने यांचा सत्कार केला गेला.

अध्यक्ष धनाजी घरत यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या गतवर्षीच्या वाटचालीचा व्यवसाय वृद्धीचा धावता आलेख सभेपुढे सादर करून व्यवसाय वृद्धीकरीताच्या सहकार्याबद्दल संस्थेच्या सर्व सभासदांचे आभार मानले. सूत्रसंचालन सुजाता जाधव यांनी, तर आभार प्रदर्शन संतोष जाधव यांनी केले.

## ग्रामीण भागात तेरड्याच्या फुलांचा बहर

**पाली : प्रतिनिधी**

माळरान, डोंगर उतार व शेताच्या बांधावर आकर्षक तेरड्याची फुले फुलली आहेत. जांभळट, फिकट गुलाबी, तांबडे किंवा पांढरे अशा विविध आकर्षक रंगांची ही फुले सगळ्यांचेच लक्ष वेधत आहेत. गणपतीबरोबर येणाऱ्या गौरीमातेला विशेषकरून ही फुले अर्पण केली जातात. त्यामुळे या झाडाला गौरी किंवा गौरीची फुले किंवा गुल मेह्दी असे म्हटले जाते.

आकर्षक तेरड्याची फुले येणाऱ्या–जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहेत. विस्तृत बहरलेली ही मनमोहक फुले मन प्रसन्न करतात. फुलांचा वापर गणपतीमध्ये माटोळीसाठीही केला जातो. चातुर्मासात पूजेसाठी तेरड्याचे महत्त्व असते. गौरीच्या



पुजेत तसेच पिठवरीच्या पुजेतही तेरडा हा लागतोच. पिठोरी अमावस्येला ''पात्री'' म्हणून तेरडा आणावा लागतो. गौरी गणपतीच्या सणाला पूजेकरिता तेरड्याची पाने फुले वाहतात.

भारतात या प्रजातीतील सुमारे १५० जाती आढळतात. सध्या सुरू असलेले मातीचे व दगड खाणींचे उत्खलन, नवनिर्माणाची व रस्त्यांची कामे; याबरोबरच मोठ्या प्रमाणात शेतात व रानमाळावर मातीचा भराव टाकला जात असल्याने या वनस्पतींची वाढ मर्यादित झाली आहे. त्यांच्या उत्पत्तीवर प्रतिकूल परिणाम होत आहे, अशी माहिती पालीतील वनस्पती अभ्यास अमित निंबाळकर यांनी दिली.

**नाजूक फुले, विविध प्रकार**

*तेरड्याची फुले अतिशय नाजूक असून पावसाळ्यात माळरान व रस्त्याच्या कडेला याची रोपे आपोआप उगवतात. फुलांचे सिंगलचा तेरडा, डबलचा तेरडा तसेच संकरीत तेरडा असे विविध प्रकार आहेत. या फुलांचे आयुष्य फक्त पाच ते सात दिवस असते.*

***औषधी आणि अन्य उपयोग***

*तेरडा हा पित्तशामक असून त्याची फुले पौष्टिक आणि थंड असतात. फिलिपिन्समध्ये या फुलांचा उपयोग कंबरदुखीवर केला जातो. फुलांमध्ये काही अँटीबायोटिकसारखे गुण सापडले आहेत, ज्यामुळे काही बॅक्टेरिया आणि फंगस नष्ट होतात. काही देशांत मेंदीप्रमाणे तेरड्याच्या पानांनी व फुलांनी हात, नखे रंगवितात. फुले थंडावा देणारी असून ती भाजलेल्या जागी लावतात. आशियातील काही देशांत ही वनस्पती संधिवात, अस्थिभंग आणि बद्धकोष्ठता इत्यादी विकारांवर वापरतात. बियांपासून मिळणारे हिरवट व चिकट तेल स्वयंपाकात व दिव्यासाठी वापरतात. एकूणच त्याचे विविध वापरही आहेत.*

## नागाव बंदर येथे अंतर्गत रस्ते कामांचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव बंदर परिसरातील नागरिकांच्या दळणवळणाची गैरसोय दूर करण्याच्या दृष्टीने समीरा प्लाम्सकडे जाणारा अंतर्गत रस्ता तसेच अभिराज पाटील यांच्या गल्लीतील अंतर्गत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून ही विकासकामे मार्गी लागली आहेत.

कार्यक्रमास सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, निखिल मयेकर, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते मनोहर ठाकूर, शरद राऊळ, चंद्रकांत पाटील यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. या दोन्ही रस्त्यांच्या कामांमुळे परिसरातील नागरिकांची ये–जा अधिक सुकर होणार असून दैनंदिन प्रवासातील अडचणी दूर होण्यास मदत होणार आहे.

नागाव परिसरातील मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी यापुढेही प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे डॉ. राऊळ यांनी सांगितले.



# टीम इंडियाची फायनलमध्ये एण्ट्री

## महिला आशिया कपमध्ये बांगलादेशवर मात

**दुबई : वृत्तसंस्था**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने महिला आशिया चषकाच्या पहिल्या सेमीफायनलमध्ये बांगलादेशचा धुव्वा उडवत दिमाखात फायनल गाठली आहे. फलंदाजीत शफाली वर्माच्या धमाकेदार खेळीनंतर गोलंदाजीत दीप्ती शर्माने कमाल केली. या विजयासह भारतीय संघाने सलग १०व्या हंगामात फायनल गाठत आशिया कप स्पर्धेतील आपला दरारा कायम राखला आहे.



दुबईच्या मैदानात रंगलेल्या पहिल्या सेमीफायनलमध्ये नाणेफेक जिंकून बांगलादेशच्या संघाने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्फोटक सलामीवीर शफाली वर्माच्या ६४ धावांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित २० षटकात सहा विकेट्सच्या मोबदल्यात १४९ धावा करत बांगलादेशसमोर १५० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ सात विकेट्सच्या मोबदल्यात १०९ धावांपर्यंतच मजल मारू शकला. भारतीय संघाने ४० धावांसह मोठा विजय नोंदवत फायनलचे तिकीट पक्के केले.

पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. धावफलकावर अवघ्या नऊ धावा असताना टीम इंडियाची क्वीन स्मृती मानधना दोन धावांवर माघारी परतली. तिच्या विकेटनंतर शफाली वर्मा आणि प्रतिका रावलची जोडी जमली. दोघींनी दुसऱ्या विकेटसाठी ४४ चेंडूंत ५० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. प्रतिका २४ चेंडूंत २० धावा करून बाद झाल्यानंतर शफालीने कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत ३३ धावांची भागीदारी केली. आशिया कप स्पर्धेतील दुसरे अर्धशतक झळकावल्यानंतर ६४ धावांवर तिच्या शानदार खेळीला ब्रेक लागला, मात्र तोपर्यंत तिने संघाच्या डावाला चांगली दिशा दिली होती.

अखेरच्या षटकांमध्ये हरमनप्रीत कौरने रिचा घोषच्या साथीने चौथ्या विकेटसाठी ३६ धावांची भागीदारी करत धावसंख्येला वेग दिला. त्यानंतर दीप्ती शर्मासोबतही तिने अवघ्या आठ चेंडूंत २१ धावांची भागीदारी केली. रिचाने १६ चेंडूंत २१ धावांची भर घातली, तर हरमनप्रीतने २८ चेंडूंत नाबाद २४ धावांची खेळी केली. दीप्तीने अखेरच्या क्षणी सहा चेंडूंत १३ धावा करत भारताला १४९ धावांपर्यंत पोहचवले

भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना बांगलादेशच्या सलामीच्या जोडीने चांगली सुरुवात केली, मात्र दीप्ती शर्मा गोलंदाजीला आली अन् तिने दिलारा अख्तरला बाद करत बांगलादेशला पहिला धक्का दिला. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी ठराविक अंतराने विकेट्स घेत बांगलादेशच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. शोर्णा अख्तरने १८ चेंडूंत नाबाद २२ धावा केल्या, पण तिची ही खेळी संघाला विजय मिळवून देण्यासाठी पुरेशी ठरली नाही.

भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. नंदिनी शर्माने दोन, तर श्री चरणी आणि प्रेमा रावतने प्रत्येकी एक विकेट घेतली. अखेर बांगलादेशचा संघ २० षटकांत ७ बाद १०९ धावांपर्यंतच मजल मारू शकला आणि भारताने ४० धावांनी दणदणीत विजय मिळवला.

या विजयासह भारतीय संघाने सलग १०व्या हंगामात फायनल गाठत आशिया कप स्पर्धेतील आपला दरारा कायम राखला आहे. भारतीय संघाच्या या शानदार विजयामुळे आता फायनल सामन्यात भारतीय महिला संघाकडून विजेतेपदाच्या ट्रॉफीची चाहत्यांना अपेक्षा आहे.




## सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानात आंतर-महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय आणि मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन फुटबॉल स्पर्धा ४ ते १२ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस.के.पाटील यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सीकेटी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व राष्ट्रीय हँडबॉल खेळाडू डॅनियल एन्थानी, मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ.मनोज रेड्डी, मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ.मनोज वर्मा, सहसचिव डॉ.व्ही.बी. नाईक यांची उपस्थिती लाभली.

स्पर्धेत ५२ महाविद्यालयातील मुलांच्या संघांनी सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. भरत जितेकर, प्रा. सरस्वती कोरडे यांच्यासह जिमखाना विभागाचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

## भारताविरुद्ध ऐतिहासिक मैत्रीपूर्ण सामन्यासाठी ब्राझील संघाची घोषणा

**ब्राझिलिया : वृत्तसंस्था**

पाच वेळा विश्वचषक विजेता असलेला ब्राझीलचा फुटबॉल संघ ३ ऑक्टोबर रोजी कोलकाता येथील विवेकानंद युवा भारती क्रीडांगणावर भारताविरुद्ध होणाऱ्या ऐतिहासिक मैत्रीपूर्ण सामन्यासाठी सज्ज झाला आहे. या सामन्यासाठी ब्राझीलचे मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी २६ सदस्यीय अत्यंत मजबूत आणि ताकदवान संघाची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे, वरिष्ठ ब्राझिलियन पुरुष संघाचा भारतीय भूमीवरील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असणार आहे.

भारतात येण्यापूर्वी ब्राझीलचा संघ २५ आणि २९ सप्टेंबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन मैत्रीपूर्ण सामने खेळेल. त्यानंतर संघ कोलकाता येथे दाखल होईल, जिथे ३ ऑक्टोबर रोजी भारतीय संघाशी त्यांची गाठ पडेल. खालिद जमील यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघासाठी जागतिक स्तरावरील सर्वात यशस्वी संघांपैकी एकाविरुद्ध स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

ब्राझीलचे प्रशिक्षक अँसेलोटी यांनी संघात दिग्गज खेळाडूंना स्थान दिले असून यात बॅलोन डी'ओरसाठी नामांकित तीन फुटबॉलपटूंचाही समावेश आहे. आक्रमक फळीत विनिसियस ज्युनियर, राफिन्हा, अँड्रिक यांच्यासह एस्तेवाओ, जोआओ पेड्रो, पेड्रो, रायन आणि सॅम्युअल लिनो यांचा समावेश करण्यात आला आहे.जागतिक दर्जाच्या खेळाडूंनी सज्ज असलेला हा संघ भारतीय चाहत्यांसाठी एक मोठी मेजवानी ठरणार यात शंका नाही.

**असा आहे संघ**

गोलरक्षक : ह्यूगो सूझा, पेड्रो मोरिस्को, ओटाव्हियो; बचावपटू : आर्थर डायस, डग्लस सँटोस, गॅब्रिएल मॅगाल्हेस, जैर, मार्किन्होस, मातुझिन्हो, मौरो ज्युनियर, व्हिटर रेस, वेस्ली; मिडफिल्डर : आंद्रेई सँटोस, ब्रेनो बिडॉन, ब्रुनो गुइमारेस, डॅनिलो सँटोस, डग्लस लुईझ, गॅब्रिएल बोंटेम्पो; फॉरवर्ड्स : अँड्रिक, एस्टेव्हाओ, जोआओ पेड्रो, पेड्रो, राफिन्हा, रायन, सॅम्युअल लिनो, विनिशियस ज्युनियर.

## शफाली वर्माने स्मृती मानधनाला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**आशिया कपमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करणारी महिला फलंदाज ठरली**

शफाली वर्माने आशिया चषक स्पर्धेतील बांगलादेशविरुद्धच्या उपांत्य सामन्यात फलंदाजी करताना स्मृती मानधनाचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. यासह महिलांच्या आशिया कपमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत शफाली अव्वल स्थानी पोहचली आहे.

शफाली वर्मा आपल्या तुफान फटकेबाजीसाठी ओळखली जाते. बांगलादेशविरुद्ध शफालीने मिळालेल्या तीन जीवदानांचा फायदा घेत दमदार अर्धशतक झळकावत ४० चेंडूंमध्ये ६४ धावांची खेळी केली. यादरम्यान तिने महिलांच्या आशिया चषक स्पर्धेत सर्वाधिक धावा करून स्मृती मानधनाचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

शफालीने या स्पर्धेतील २० डावात ५९३ धावा केल्या आहेत. स्मृतीने १८ डावांत ५९० धावा केल्या होत्या, तर कर्णधार हरमनप्रीत कौरने १८ डावांत ४६५ धावा केल्या आहेत. याशिवाय जेमिमा रॉड्रिग्जने १६ डावात ३४५ धावा आणि ऋचा घोषच्या नावे १७ डावात २३१ धावा केल्याची नोंद आहे.

## श्री चरणीचे कमी वयात विकेट्सचे अर्धशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



दुबई येथे सुरू असलेल्या महिला टी-२० आशिया चषक स्पर्धेत भारतीय महिला संघाने धडाकेबाज कामगिरी करत फायनलमध्ये धडक मारली आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशवर ४० धावांनी दमदार विजय मिळवला. या विजयासोबतच भारताची युवा डाव्या हाताची फिरकीपटू श्री चरणी हिने आपल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर क्रिकेट जगतात नवा इतिहास रचला आहे.

अवघ्या २२ वर्षे ३७ दिवस वय असलेल्या श्री चरणी हिने या सामन्यात महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपल्या ५० विकेट्सचा टप्पा पूर्ण केला. या कामगिरीसह ती महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद ५० विकेट्स घेणारी भारतीय महिला गोलंदाज ठरली आहे. श्री चरणीने हा टप्पा अवघ्या २९ सामन्यांमध्ये गाठला. याआधी हा विक्रम राधा यादव हिच्या नावावर होता, जिने ३६ सामन्यांत ५० विकेट्स घेतल्या होत्या. वयाच्या अवघ्या २२ वर्षे ३७व्या दिवशी हा पराक्रम करत तिने भारताची अनुभवी खेळाडू दीप्ती शर्मा हिला मागे टाकले आहे. दीप्तीने वयाच्या २२ वर्षे १८७व्या दिवशी ५० विकेट्स पूर्ण केल्या होत्या.

२०२५मध्ये आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या श्री चरणीने अल्पावधीतच भारतीय संघातील मुख्य मॅच विनर गोलंदाज म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जागतिक स्तरावरही तिचे नाव दिग्गज खेळाडूंच्या यादीत जोडले गेले आहे.

महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात ५० विकेट्स घेण्याची कामगिरी इंग्लंडच्या सोफी एक्लेस्टोन हिच्या नावावर आहे. तिने हा कारनामा २० वर्षे ३००व्या दिवशी पार केला होता, तर सर्वांत कमी म्हणजेच २८ सामन्यांत हा पराक्रम चीनच्या मेंगटिंग लिऊ हिने केलेला आहे.

## धोनीला मागे टाकण्याची ईशान किशनला संधी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमधील दुलीप ट्रॉफी स्पर्धेत मोठा धमाका करत पूर्व विभागाला ट्रॉफी जिंकून देणारा ईशान किशन आता अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेत मैदानात उतरणार आहे. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर रंगणाऱ्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ईशान किशनला भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीला मागे टाकण्याची संधी आहे. यासाठी त्याला केवळ १० धावांची गरज आहे.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ १३ सप्टेंबरला अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला सुरुवात करणार आहे. हा सामना दिल्लीतील मैदानावर होत असला, तरी या द्विपक्षीय टी-२० मालिकेचे यजमानपद अफगाणिस्तानकडे आहे. या सामन्यात ईशान किशनला आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत धोनीला मागे टाकण्याची संधी आहे.

**फक्त १० धावांची गरज**

टीम इंडियाकडून टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजामध्ये सध्याच्या घडीला महेंद्रसिंह धोनी नवव्या स्थानावर असून त्याच्या खात्यात १६१७ धावा आहेत. अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेत ईशानने आणखी १० धावा केल्या, तर तो धोनीला मागे टाकत फलंदाजांच्या यादीत टॉप ५च्या दिशेने वाटचाल करेल.

## श्रेयस, शार्दुलसोबत रोहितने धरला ठेका!

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेटचे मैदान गाजवल्यानंतर आता हिटमॅन रोहित शर्माने आपल्या आयुष्यातील दुसऱ्या इनिंगला सुरूवात केली आहे. १९ सप्टेंबरला रोहितचा नवीन शो 'फॅमिली फुल हाऊस विद रोहित शर्मा' प्रदर्शित होणार आहे. शो च्या प्रोमोमधील एक व्हिडीओ जोरदार व्हायरल होत आहे, ज्यामध्ये रोहित हा श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूरसोबत डान्स करताना दिसून येत आहे.

फॅमिली फुल हाऊस विद रोहित शर्माच्या पहिल्या एपिसोडमध्ये शादुल ठाकूर, श्रेयस अय्यर आणि अभिषेक नायर या स्टार खेळाडूंनी हजेरी लावली होती. यादरम्यान चौघांनी मिळून सेहरी बाबू गाण्यावर डान्स केला. शेवटी रोहित स्टेप्स विसरला आणि म्हणाला, "अरे सर्वच विसरले.." हा मजेशीर व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

## सचिन तेंडुलकरच्या टीमकडून रमाबाईंच्या मुलींसह चौघांना शूज भेट



**बीड : प्रतिनिधी**

मुलींच्या शिक्षणासाठी अनवाणी मॅरेथॉनमध्ये धावून तीन हजार रुपयांचे बक्षीस जिंकणाऱ्या बीड जिल्ह्यातील अंबाजोगाईच्या ४७ वर्षीय रमाबाई रणवीर यांच्या जिद्दीची दखल सचिन तेंडुलकरने घेतली आहे. रमाबाईंच्या संघर्षाची कहाणी समजल्यानंतर तेंडुलकरने त्यांना रनिंग शूज देण्याची इच्छा व्यक्त केली.

सचिन तेंडुलकरच्या टेन एक्स यू टीमने परस्पर परिचितांच्या माध्यमातून रमाबाईंशी संपर्क साधला. रमाबाईंकडे स्वतःचा मोबाईल फोन नसल्याने त्यांच्या अंबाजोगाई येथील घरी रनिंग शूज पोहचवण्याची व्यवस्था करण्यात आली, मात्र शूज मिळाल्यानंतर रमाबाईंनी दाखवलेली उदारता विशेष ठरली. ज्या व्यक्तीने त्यांना मॅरेथॉनबद्दल माहिती दिली, त्यालाही शूज मिळावेत, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्याच्या प्रोत्साहनामुळेच आपण या शर्यतीत सहभागी होऊ शकलो, असे रमाबाईंनी सांगितले.

रमाबाईंची ही विनंतीही तेंडुलकरच्या टीमने मान्य केली. त्यानुसार रमाबाई, त्यांच्या दोन मुली आणि मॅरेथॉनचे आयोजन करणाऱ्या समितीतील ज्या सदस्याने त्यांना या स्पर्धेची माहिती दिली, अशा चौघांसाठी रनिंग शूजची व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान, सचिन तेंडुलकरने आपली कहाणी पाहिली असून त्याला आपली जिद्द प्रेरणादायी वाटल्याचे समजल्याने रमाबाईंना विशेष आनंद झाला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com